❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २७१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

**उद्या अंक नाही**

आज शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ "अनंत चतुर्दशी" निमित्त दै. संध्या कार्यालयाला सुट्टी असल्याने शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

\- संपादिका

# अनंत चतुर्दशी



## भक्ती, संस्कृती आणि पर्यावरणाचा संदेश

*अनंत चतुर्दशी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा आणि श्रद्धेचा दिवस. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या उत्सवानंतर येणारी अनंत चतुर्दशी म्हणजे भक्ती, भावनांचा आणि संस्कृतीचा अनोखा संगम. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात गणरायाला निरोप देताना प्रत्येक भक्ताच्या मनात आनंदाबरोबरच विरहाची भावना निर्माण होते.गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. घराघरात आणि सार्वजनिक मंडळांमध्ये मोठ्या भक्तिभावाने गणरायाची प्रतिष्ठापना केली जाते. दहा दिवस पूजा, आरती, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध सामाजिक उपक्रमांनी वातावरण भक्तिमय होते. या उत्सवाचा समारोप अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनाने होतो.*

**भक्तीचा आणि भावनेचा निरोप**

गणरायाच्या विसर्जनाची मिरवणूक हा अनंत चतुर्दशीचा प्रमुख आकर्षणाचा भाग असतो. ढोल-ताशांचा निनाद, लेझीमची लय, भगवे ध्वज, फुलांची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून जातो. विसर्जनाच्या क्षणी अनेक भक्तांच्या डोळ्यांत अश्रू तरळतात. दहा दिवस आपल्या घरात किंवा मंडपात विराजमान असलेल्या बाप्पाला निरोप देताना भक्त आपल्या सुख-दुःखाच्या भावना गणरायाच्या चरणी अर्पण करतो. मात्र हा निरोप कायमचा नसतो.'पुढच्या वर्षी लवकर या'या विश्वासाने भक्त पुन्हा गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा सुरू करतो.

**उत्सवातून सामाजिक एकोपा**

गणेशोत्सवाने समाजाला एकत्र आणण्याचे काम केले आहे. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती यापलीकडे जाऊन नागरिक एकत्र येतात. सार्वजनिक गणेश मंडळांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, गरजू विद्यार्थ्यांना मदत, वृक्षारोपण, सामाजिक जनजागृती अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव बनला आहे. हीच परंपरा अधिक बळकट करण्याची गरज आहे.

**पर्यावरणपूरक विसर्जनाची गरज**

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. जलप्रदूषण, निर्माल्याची विल्हेवाट, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणि रासायनिक रंगांमुळे होणारे प्रदूषण याबाबत समाजात जागरूकता वाढत आहे. परंपरा जपत पर्यावरणाचे संरक्षण करणे ही आजची गरज आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंगांचा वापर, कृत्रिम विसर्जन तलाव, निर्माल्य संकलन आणि पुनर्वापर यांसारख्या उपायांना नागरिकांनी सहकार्य केले, तर भक्ती आणि पर्यावरणसंवर्धन यांचा सुंदर समतोल साधता येईल.

**शिस्त आणि सुरक्षिततेलाही महत्त्व**

अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर नागरिक रस्त्यावर येतात. त्यामुळे मिरवणुकीदरम्यान वाहतूक व्यवस्था, गर्दीचे नियोजन, ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण, महिला व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता आणि आपत्कालीन सेवांची उपलब्धता याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. उत्सवाचा आनंद घेताना सार्वजनिक शिस्त आणि इतर नागरिकांच्या हक्कांचा विचार करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. उत्सव जितका मोठा, तितकीच आपली जबाबदारीही मोठी असते.

बाप्पा निरोप घेतो; संस्कार मात्र सोबत ठेवतो

गणरायाचे विसर्जन म्हणजे केवळ मूर्तीचे पाण्यात विसर्जन नव्हे. गणपती आपल्याला बुद्धी, विवेक, संयम, एकोपा आणि सकारात्मकतेचा संदेश देतो. दहा दिवसांच्या उत्सवानंतर बाप्पा आपल्या डोळ्यांआड जातो; पण त्याने दिलेले संस्कार आपल्या आचरणात राहिले पाहिजेत.

अनंत चतुर्दशी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते उत्सव साजरा करा, पण जबाबदारीने. श्रद्धा जपा, पण पर्यावरणही जपा. परंपरा जपा, पण सामाजिक बांधिलकीही जपा. आनंद साजरा करा, पण दुसऱ्यांच्या आनंदाचाही विचार करा. गणरायाला निरोप देताना प्रत्येकाच्या ओठांवर एकच जयघोष असतो

**"गणपती बाप्पा मोरया,**
**पुढच्या वर्षी लवकर या!"**

बाप्पा जातोय... पण त्याची भक्ती, त्याचा आशीर्वाद आणि त्याने दिलेला सकारात्मकतेचा संदेश आपल्या मनात सदैव राहो, हीच अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने प्रार्थना.

# वाशिम जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून शेतकऱ्यांना भरपाई देण्याच्या घोषणेचा पुनरुच्चार; शेतकऱ्यांना दिलासा देणार

**म्हसला, मोहगव्हाण व जऊळका येथे पीक-पाणी परिस्थितीची पाहणी**

■ वाशिम (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वाशिम जिल्ह्यातील म्हसला, ता. कारंजा, मोहगव्हाण, ता. मंगरुळपीर आणि जऊळका, ता. मालेगाव येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पीक-पाणी परिस्थितीची पाहणी केली. शेतकऱ्यांना भरपाई देण्याच्या घोषणेचा पुनरुच्चार करून मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल, अशी ग्वाही दिली. दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम विदर्भातील म्हणजे अमरावती विभागातील पीक-पाणी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज सकाळी अमरावती विमानतळ येथे शासकीय विमानाने आगमन झाले. तेथून ते मोटारीने वाशिम जिल्ह्यातील म्हसला, ता. कारंजा येथील शेतकरी देविदास किशन काळे यांच्या शेतात जाऊन शेतातील नुकसानग्रस्त सोयाबीन व तूर पिकाची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला.

मोहगव्हाण, ता. मंगरुळपीर येथील शेतकरी अनिल भगरे, तसेच अब्दुल नईम शेख रहीम यांच्या शेतातील नुकसानाची पाहणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. ते म्हणाले, कमी पर्जन्यमानामुळे सोयाबीन, तूर आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर हे मोठे संकट आहे. तथापि, शेतकरी बांधवांनी खचून जाऊ नये. शासन शेतकऱ्यांसोबत आहे. त्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येईल. यासंबंधीची अधिसूचनाही लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल. जऊळका, ता. मालेगाव येथील शेतकरी संतोष सखाराम डुंबळे यांच्या शेतीच्या बांधावर जाऊन दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी केली. उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकरी संतोष यांच्या आई शकुंतलाबाई यांनीही दुष्काळी परिस्थितीची कैफियत मांडली. या दौऱ्यात परिसरातील पीक-पाणी परिस्थितीची सविस्तर माहिती घेऊन मुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याच्या आपल्या घोषणेचा पुनरुच्चार केला. अत्यल्प पर्जन्यमानामुळे आसमानी संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल. संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांसोबत आहे. त्यांनी कोणतीही चिंता करू नये. झालेल्या नुकसानीचा अंदाज घेऊन शासनाकडून आवश्यक मदत प्राधान्याने आणि लवकरात लवकर दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून आवश्यक नियोजन करण्यात येईल. त्याचप्रमाणे चारा उपलब्धतेसाठीही दक्षता घेतली जाईल. शेतकऱ्यांना शासनाची मदत थेटपणे मिळण्यासाठी लवकरच कार्यवाही सुरू होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.



या दौऱ्यात खासदार संजय देशमुख, खासदार अनुप धोत्रे, आमदार बाबुसिंग महाराज, आमदार सई डहाके, आमदार श्याम खोडे, आमदार रणधीर सावरकर, आमदार भावना गवळी, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी तसेच शेतकरीबांधव उपस्थित होते.

# 'ज्ञानेश कुमार यांनी राष्ट्रद्रोह केला, त्यांना हाकलून द्या' : जितेंद्र आव्हाड

■ मुंबई (दै. संध्या)

केंद्रीय निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि त्यांचे सहकारी निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू व विवेक जोशी यांच्यातील अंतर्गत मतभेदांमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. गेल्या दहा महिन्यांत दोन्ही आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर तब्बल 14 वेळा लेखी आक्षेप नोंदवले असल्याची माहिती समोर आली असून नवीन मतदारांची नोंदणी, मतदार यादीतून नावे वगळणे आणि ती पुन्हा समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेवर तसेच एसआरएच्या मुद्द्यावरून फॉर्म-6 मधील सुधारणांवर विरोध दर्शवण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकारानंतर विरोधी पक्ष आक्रमक झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर घणाघाती टीका करत त्यांचा थेट निषेध नोंदवला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, "ज्ञानेश कुमार हे चपला उचलणारे आयुक्त झाले नसते... ज्ञानेश कुमार यांनी राष्ट्रद्रोह केला. महाराष्ट्रातला सत्ता बदल राजीव कुमार यांनी केला. एसआयआर हा स्कॅम आहे. निवडणूक आयोग हा चोर आहे. चोर समोर दिसतोय पुढच्या चोऱ्या थांबण्यासाठी चोर पकडणं गरजेचे आहे. फॉर्म नंबर 6 मध्ये बदल करण्यात आले. लोकशाही जिवंत ठेवायला जनतेने आवाज उठवावा. ज्ञानेश कुमार यांना हाकलून देण्यात यावे. तृतीय पंथीयांची नावेच नोंदवली जात नाही, त्यांना मतदानाचा अधिकार नाही. ज्ञानेश कुमार यांना कोणी तरी दुसरंच ऑपरेट करतंय, असा आरोप त्यांनी केला. जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले की, एसआयआर फॉर्मबाबत सर्वांनी अशीच भूमिका घ्यावी. रस्त्यावरती उतरावे. ज्ञानेश कुमार हा हलकट, लोचट अधिकारी आहे. राजीव कुमार हा लोचट अधिकारी नसता तर शरद पवार यांच्या हातून राष्ट्रवादी पक्ष गेला नसता. पक्षाचं नाव लावून तसेच क्लार्क म्हणून काम करतात. आयटी डिपार्टमेंटमध्ये येतेच कशी? निवडणूक आयोग कोणाच्या हाताच खेळणं झालंय हे दुर्भाग्य आहे," अशी टीका त्यांनी केली.

# बारामती तालुक्यात गणेश विसर्जन मिरवणुकीत अश्लील नृत्य

■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव, अंगविक्षेप व बीभत्स नृत्य केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. कोऱ्हाळे बुद्रुक ता बारामती येथील माळशिकारेवाडी परिसरात बुधवारी (ता. २३) रात्री सव्वानऊच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. राधा संग्राम घुले, मीनाक्षी बापुराव रुपनवर, काजल नितीन शिंदे, रा लाकडी ता इंदापूर अशी नृत्यांगनांची नावे असून रोहित हणमंत धुमाळ रा गोखळी ता फलटण जि. सातारा डॉल्बी मालक तसेच मंडळाचे पदाधिकारी राहुल दिलीप माळशिकारे, दीपक सुभाष माळशिकारे, निखील जालिंदर माळशिकारे, सर्व रा. माळशिकारेवाडी कोऱ्हाळे बुद्रुक ता बारामती जी पुणे अशी गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्री साई समर्थ तरुण मंडळ, माळशिकारेवाडी यांच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ट्रॅक्टर (एमएच ४२ क्यू २६४४) व त्यास जोडलेल्या चारचाकी ट्रॉलीमध्ये डॉल्बी संगीत सुरू होते. त्यावर महिला नृत्यांगनांकडून सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव, अंगविक्षेप व बीभत्स नृत्य केले जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या प्रकारास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह संबंधित व्यक्तींकडून प्रोत्साहन दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. विसर्जन मिरवणुकीसंदर्भात मंडळाच्या अध्यक्षांना सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, या सूचनांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मुलाणी करीत आहेत. गणेशोत्सव व विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासन व पोलिस प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन वडगाव निंबाळकर पोलिसांनी केले आहे.




**बाप्पा, पुढल्या वर्षी लवकर या ....**

**सर्व गणेश भक्तांचे मन:पूर्वक आभार!**

पुणे शहरातील गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी पर्यंत चालणारा गणेशोत्सवाचा आनंदमयी सोहळा कुठलाही अनुचित प्रकार न घडता श्रध्देने व भक्तीभावाने, उत्साहाने, पुण्यनगरीच्या वैभवात व किर्तीत भर घालणारा असा पार पडला त्या बद्दल सर्व गणेशभक्त व गणेश मंडळांचे कार्यकर्ते यांना धन्यवाद!

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने यंदा सादर केलेला **प्रेम मंदिर, वृंदावन** या देखाव्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

गतवर्षी प्रमाणे यंदाही संपूर्ण विसर्जन मिरवणुकीस होणारा विलंब, भक्तांचे ताटकळणे व अनंत चतुर्दशी ऐवजी पितृपक्षात होणारे विसर्जन टाळण्यासाठी आम्ही अनंत चतुर्दशी दिवशी दुपारी ४ वाजता विसर्जन मिरवणुकीत सामिल झालो, या निर्णयास सर्व गणेशभक्तांनी, गणेश मंडळांनी, पोलीस प्रशासनाने सहकार्य केले.

उत्सवानिमित्तानेमहाराष्ट्राचेमुख्यमंत्री,उप-मुख्यमंत्री,त्यांचेसहकारी,खासदार,आमदार,महापौर,उप-महापौर, पालिकाआयुक्त, पोलीसआयुक्त,सह.पोलीसआयुक्त,पुणेपोलीस,विभागीयआयुक्त,जिल्हाधिकारी,होमगार्डस्,खाजगीसुरक्षारक्षक,स्वयंसेवीसंस्था, सर्व वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमे, कला दिग्दर्शक, विद्युतरोषणाईकार,लाऊडस्पिकरअसोसिएशन,बँका,सर्व प्रिंटर्स, बी.एस.एन.एल. व इतर दूरसंचार कंपन्या, महाराष्ट्रराज्यवीजवितरणकं.पुणे, शासकीयअधिकारी, कर्मचारी, अग्नीशामक दल, पाटबंधारे विभाग,रेल्वेप्रशासन,एस.टी.महामंडळआणिपी.एम.पी.एम.एल., केबलचालक, नारळ व्यापारी, श्रमजिवी, मेट्रोरेल, फोटो-व्हिडिओग्राफर्स, ढोल-ताशापथक, मंडळांचे कार्यकर्ते, कोट्यावधी भाविक, ब्रह्मवृंद, या सर्वांचे उत्सवा दरम्यान बहुमोल सहकार्य मिळाले, सफाई कामगारांनी सर्व रस्ते त्वरीत स्वच्छ करुन पर्यावरणाचे रक्षण केले

**या सर्वांप्रति आम्ही आभारी आहोत, कृतज्ञ आहोत, धन्यवाद, जय गणेश!**

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट, पुणे ● सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे**

Visit us at: www.dagdushethganpati.com ● E-mail: contact.dhgt@gmail.com, jayganesh@gmail.com



दैनिक संध्या | शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६



# अजितदादांच्या जयंतीनिमित्त शैक्षणिक मदतीचा हात

■ सुरज देवकाते यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

■ बारामती नगरपरिषद शाळा क्रमांक ८ मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



■ बारामती (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते यांच्या वतीने बारामती नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक ८ मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

आर्थिक परिस्थितीमुळे शैक्षणिक साहित्याची अडचण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळावा आणि शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना अधिक आत्मविश्वासाने पुढे जाता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजक सुरज देवकाते यांनी सांगितले. सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रयत्न यापुढेही सुरू ठेवण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. संभाजी होळकर, ॲड. किरण इंगळे, विशाल जाधव, श्वेता नाळे, भारती शेळके, साधू बल्लाळ, तानाजी पाथरकर आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरज देवकाते यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पुणे जिल्हा अध्यक्ष संभाजी होळकर, बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे, बारामती नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, उपगटनेते संपदा चौधर, महिला व बालकल्याण सभापती सविता जाधव, नगरसेविका धनश्री बांदल, अनुप्रिता डांगे, भारती शेळके, शर्मिला ढवाण, मंगला किर्वे, युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, विशाल जाधव, अविनाश बांदल, पत्रकार साधू बल्लाळ, तानाजी पाथरकर, अनिकेत कांबळे, मन्सूर शेख, अजिंक्य सातकर, अनिता गायकवाड, प्रा. आजिनाथ चौधर, पार्थ गालिंदे, ॲड शिवकांत वाघमोडे,विजया आल्लगी, सुलेखा होळकर, अश्विनी तावरे, शाळेचे मुख्याध्यापक नीलकंठ कापसे सर, सोनाबाई काळे आदी मान्यवर उपस्थित होते. अजितदादांच्या जयंतीनिमित्त आयोजित या शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासोबतच सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

"विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविणे ही सामाजिक बांधिलकी जपणारी बाब आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम या उपक्रमातून होत आहे. अजितदादांच्या जयंतीनिमित्त सुरज देवकाते यांनी राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, समाजातील इतरांनीही अशा विधायक उपक्रमांसाठी पुढाकार घ्यावा.

**- संभाजी होळकर, (पुणे जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )**

"विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविणे ही समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणारी बाब आहे. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांना निश्चितच प्रोत्साहन मिळते. दिवंगत अजितदादांच्या जयंतीनिमित्त सुरज देवकाते यांनी राबविलेला हा उपक्रम समाजातील इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून समाधान वाटले"

**- ॲड. किरण इंगळे, (शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बारामती)**

## थोडक्यात पण महत्वाचे

### वाहन चालवताना स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेची काळजी घ्या : शंकर भोसले



बारामती : दैनिक संध्या

वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करून स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेची काळजी घ्या, असे आवाहन भिगवण पोलीस ठाण्याचे शंकर भोसले यांनी स्वामी विवेकानंद असोसिएशन यांच्या इंदापूर तालुक्यातील मदनवाडी चौकातील गणेश मंडळासमोर आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात केले. श्री. भोसले यांनी शाळा व दवाखान्यांच्या परिसरात वेगमर्यादा पाळावी,वाहन नेहमी सुरक्षित व नियंत्रित वेगाने चालवावे, वाहतूक सिग्नल व चिन्हांचे पालन करावे,वाहन चालवताना मोबाईलचा वापर करू नये, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर करावा.नो-पार्किंग झोनमध्ये वाहने पार्क करू नयेत. पादचारी मार्ग व झेब्रा क्रॉसिंगवर वाहने थांबवू नयेत, मद्यपान करून वाहन चालवू नये, पुढील वाहनापासून योग्य अंतर ठेवावे.रुग्णवाहिका, अग्निशमन दल यांसारख्या आपत्कालीन वाहनांना मार्ग द्यावा, अशा सूचनाही नागरिकांना दिल्या. यावेळी पोलीस पुणे ग्रामीण वाहतूक विभागाचे गणेश सोनबा करचे यांनी वाहतूक नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन केले.




### विद्यार्थ्यांसाठी टेक्नॉलॉजी व रोजगार उपलब्ध करून देणार : आमदार राहुल कुल

दौंड : दैनिक संध्या

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुका पाटस येथे गुरुवार दिनांक 24 सप्टेंबर रोजी रयत शिक्षण संस्था व नागेश्वर विद्यालय पाटस यांच्या वतीने डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांची 139 वी जयंती सोहळा आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार राहुल कुल प्रमुख पाहुणे रमेश थोरात जिल्हा सदस्य अनुराधा शितोळे, पंचायत सदस्य शिवाजी ढमाले, पोलीस निरीक्षक सुधीर कदम नामदेव शितोळे, योगेंद्र शितोळे,सिताराम भागवत, बाळासाहेब भागवत, इंदुमती शितोळे, अवंती शितोळे, बाबासाहेब कोळेकर, आबासाहेब खारतोडे, मधुकर आव्हाड, सुरेश भागवत, चंद्रकांत भागवत, इतर मान्यवर उपस्थित होते विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी सातत्याने मी प्रयत्न करणार पाटस येथील रयत शिक्षण संस्थेमध्ये अनेक विद्यार्थी चांगल्या पदावरती आहेत विद्यार्थ्यांच्या पुढील भविष्यासाठी भाजप सरकार नवीन टेक्नॉलॉजी व रोजगार उपलब्ध करत आहे. नवीन कंपन्या उभारण्याचे काम भाजप सरकार करत आहेत असे राहुल कुल यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

## गणेशखिंड रस्त्यावरील ५०० झाडे वाचली

■ पुणे (दै. संध्या)

गणेशखिंड रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सुमारे ५२९ झाडे तोडण्याचे नियोजन केले होते. यामुळे मोठी वृक्षसंपदा नष्ट होणार असल्याने नागरिकांनी, पर्यावरणप्रेमींनी यास कडाडून विरोध केला होता. त्यानंतर महापालिकेने पुन्हा एकदा यासंदर्भात अभ्यास केला असता आता केवळ ३३ झाडे तोडावी लागणार असून, त्यातील काही झाडांचे पुनर्रोपण होणार आहे. दरवेळी नागरिकांच्या तक्रारीला नकारात्मक न घेता त्याचा सकारात्मक विचार केल्याने गणेशखिंड रस्त्यावरील ४९६ झाडांना जीवदान मिळाले आहे. संचेती रुग्णालय ते आनंद ऋषिजी चौक (पुणे विद्यापीठ चौक) या दरम्यानच्या रस्त्याचे ४५ मीटर रुंदीकरण केले जाणार आहे. त्यासाठी महापालिकेने खासगी जागा मालक, शासकीय संस्थांची जागा ताब्यात घेतली. त्याबदल्यात त्यांना मोबदला दिला, काहींच्या मागणीनुसार त्यांना सुरक्षा भिंतही बांधून देण्यात आली. ही जागा ताब्यात आल्यानंतर रुंदीकरणात अडथळा ठरणारी झाडे काढण्यासाठीची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली होती. यास विरोध करत ‘परिसर’सह संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. २०२३ मध्ये न्यायालयाने महापालिकेच्या वृक्षतोडीच्या प्रक्रियेवर आक्षेप नोंदवत, नागरिकांच्या हरकती आणि सूचनांचा विचार करूनच वृक्ष प्राधिकरणाने निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले होते.

## पद्मावती येथे ‘श्री स्वामी समर्थ प्रकट दिन’ जिवंत देखावा

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील पद्मावती, चव्हाण नगर येथील सिद्धार्थ राजेंद्र परदेशी आणि परदेशी परिवाराने यंदाच्या गणेशोत्सवात आपल्या घरी अत्यंत देखणा आणि वैशिष्ट्यपूर्ण चलचित्रीत (हालता) देखावा साकारला आहे. या वर्षी त्यांनी 'श्री स्वामी समर्थ प्रकट दिन' या भक्तीमय संकल्पनेवर आधारित देखावा तयार केला असून, तो पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.पारंपरिक आणि आधुनिकतेचा मेळ या देखाव्यामध्ये भगवान श्री गणेश, दत्तात्रय माउली आणि श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या सुंदर मूर्तींची स्थापना करण्यात आली



आहे. कृत्रिम निसर्ग, गुहा आणि हालत्या हालचालींचा (चलचित्र) प्रभावी वापर करून स्वामी समर्थांच्या प्रकट दिनाचा प्रसंग हुबेहूब जिवंत करण्यात आला आहे. परदेशी परिवाराची ही कल्पकता आणि भक्ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.सोशल मीडियावरही धूम हा अप्रतिम देखावा नागरिकांना डिजिटल माध्यमातूनही पाहता यावा यासाठी याचा संपूर्ण व्हिडिओ सोशल मीडियावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. नागरिक हा व्हिडिओ त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम पेज (Instagram ID: pardeshisidd) वर पाहू शकतात, असे आवाहन सिद्धार्थ परदेशी यांनी केले आहे.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणीबाबत मार्गदर्शन

■ बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६’ अन्वये महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी प्रक्रियेबाबत इंदापूर तालुक्यातील तक्रारवाडी येथे गणेश मंडळ छावा ग्रुप येथे जिल्हा माहिती कार्यालयाचे वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात भिगवनच्या सहाय्यक कृषी अधिकारी पल्लवी काळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्रीमती काळे यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली. महिला शेतकऱ्यांचा फॉर्मर आयडी काढणे, त्याची नोंदणी करणे तसेच पोर्टलवर अर्ज सादर करण्याची प्रक्रिया याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली.

शेती आणि शेतीपूरक कामांमध्ये योगदान देणाऱ्या महिलांना अधिकृत ओळख मिळावी, यासाठी ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६’ लागू करण्यात आला आहे. जमिनीची मालकी नसली तरी शेती व शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांना ‘महिला शेतकरी प्रमाणपत्र’ देण्यात येणार आहे. यामध्ये मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन आणि रेशीम उद्योग करणाऱ्या महिलांचाही समावेश करण्यात येणार असल्याचे श्री. जाधव यांनी सांगितले. पोर्टलवर अर्ज करताना आधार क्रमांक व ओटीपीद्वारे पडताळणी, वैयक्तिक माहिती भरणे, शेतीविषयक तपशील नोंदविणे तसेच फॉर्मर आयडी जोडण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. अर्जातील माहिती अचूक भरूनच अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले. महिला शेतकऱ्यांनी अधिकाधिक संख्येने ऑनलाइन नोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती काळे यांनी केले. ‘लोकसंवाद-२०२६’ च्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रमाणपत्रासाठी आवश्यक ऑनलाइन प्रक्रिया प्रत्यक्ष समजून घेता आल्याच्या प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## गणेशोत्सवानिमित्त बाबू पाटे यांची विविध मंडळांना भेट



■ नारायणगाव (दै. संध्या)

गणेशोत्सवानिमित्त बाबू पाटे यांनी परिसरातील विविध गणेशोत्सव मंडळांना भेटी देऊन गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत गणेशोत्सवाच्या आयोजनाबाबत माहिती घेतली. यावेळी श्री मुक्ताई युवक मंडळ विटे मळा, विघ्नहर्ता मित्र मंडळ मुक्ताई नगर, नवनाथ मित्र मंडळ वाजगे डिंबळे मळा, मुंजोबा मित्र मंडळ गव्हाळी मळा, नवशक्ती मित्र मंडळ वारूळवाडी, मुक्ताई मित्र मंडळ वारुळेमळा, झुंजारराव परिवार वारूळवाडी आणि प्रगती मित्र मंडळ आनंदवाडी या मंडळांना त्यांनी भेट दिली. तसेच महासुर्योदय मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘होम मिनिस्टर’ कार्यक्रमालाही त्यांनी उपस्थिती लावली. विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या स्वागताबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा आणि आपुलकीची भावना वृद्धिंगत होत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

## गोमांस वाहतूक करणाऱ्यावर जुन्नर पोलिसांची धडक कारवाई

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर शहरातील खलीलपुरा भागात बेकायदेशीररित्या गोमांसाची वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला जुन्नर पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे, तर त्याचा एक साथीदार पोलिसांना चकवा देऊन पळून जाण्यात यशस्वी ठरला.

जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या आदेशानुसार मंगळवारी जुन्नर शहरात गस्त घातली जात होती. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पोलीस शिपाई गणेश भरत शिंदे आणि त्यांचे सहकारी खलीलपुरा भागात पोहोचले असता, त्यांना एका खात्रीलायक बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक व्यक्ती गोवंशाचे मांस विक्रीसाठी घेऊन जाणार आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्वरित खलीलपुरा भागात पाळत ठेवली. दुपारी १:१५ वाजण्याच्या सुमारास एका होंडा शाईन दुचाकीजवळ (एमएच १४ एफ जे १२८७) दोन संशयास्पद व्यक्ती थांबलेल्या पोलिसांना दिसल्या. पोलिसांची गाडी जवळ येताच दोन्ही व्यक्तींनी तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तत्परता दाखवत पाठलाग केला आणि फजलेहक फकीर महंमद कुरेशी वय ५० वर्ष, रा. खलीलपुरा, जुन्नर याला शिताफीने पकडले. त्याचा दुसरा साथीदार जब्बार अब्बास कुरेशी रा. खलीलपुरा, जुन्नर हा मात्र पोलिसांना पाहून पळून जाण्यात यशस्वी झाला.

पोलिसांनी पकडलेल्या फजलेहक कुरेशी याच्या दुचाकीची झडती घेतली असता, गाडीला लटकवलेल्या पिशवीत आणि डिक्कीमध्ये सुमारे २० किलो गोमांस आढळून आले. पोलिसांनी या कारवाईत गोमांसासह दुचाकी आणि इतर मुद्देमाल जप्त केला आहे. फरार आरोपी जब्बार कुरेशी याचा पोलीस सध्या शोध घेत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास जुन्नर पोलीस करत आहेत.

## अखेर पुणे-नाशिक रेल्वे सुरू

■ नारायणगाव (दै. संध्या)




आज पुणे - नाशिक रेल्वेचा डबा पुण्यावरून नाशिकला गेल्यामुळे नागरिकांचे व लहान मुलांचे अनेक दिवसांचे रेल्वे पाहण्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे .आंबेगाव,जुन्नर तालुक्यातून पुण्यावरून नाशिककडे जाणारी रेल्वे आज चक्क रस्त्यावरून कंटेनरवरून जाताना दिसली. कळंब व नारायणगाव जवळील हद्दीत पुणे-नाशिक महामार्गावर हा अनोखा नजारा पाहून नागरिकांची एकच गर्दी उसळली.

कळंब गावाचे माजी उपसरपंच डॉ. सचिन भालेराव हे आपल्या मुलांना शाळेत सोडण्यासाठी जात असताना पुणे-नाशिक महामार्गावर त्यांना हा दुर्मिळ प्रसंग दिसला. पुण्याच्या बाजूने नाशिककडे एक संपूर्ण रेल्वेचा डबा (कोच) एका अवाढव्य कंटेनर ट्रेलरवरून नेला जात होता. हा मोह आवरता न आल्याने डॉ. भालेराव यांनी आपल्या मोबाईलमध्ये त्याचे चित्रीकरण केले.तसेच पाटे मळा येथील दूध उत्पादक शेतकरी ईश्वर पाटे यांनी लहान मुलांना घेऊन ही रेल्वे दाखविल्याने मुलांनीही आनंद व्यक्त केला.

पुणे-नाशिक रेल्वे झाली तर स्थानिक शेतकरी, व्यावसायिक, प्रवासी नागरिक आणि सामान्य जनतेला मोठा फायदा भविष्यात होऊ शकतो, असे मत प्राध्यापक दत्ता भालेराव व ईश्वर पाटे यांनी व्यक्त केले आहे. यावेळी त्यांच्या सोबत असलेल्या लहान मुलांनाही “रेल्वे आली, रेल्वे आली” म्हणत मोठा आनंद झाला. गेल्या कित्येक वर्षांपासून आंबेगाव व जुन्नरकरांचे स्वप्न असलेली पुणे-नाशिक रेल्वे प्रत्यक्षात अशी कंटेनरवरून जाताना पाहून नागरिकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत काकोडकर समितीचा अहवाल अद्याप येणे बाकी आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून या मार्गासाठी वारंवार सर्वे, घोषणा होतात पण प्रत्यक्षात रुळ अंथरले जात नाहीत. अशा पार्श्वभूमीवर रेल्वे अशी कंटेनरवरूनच जाणार का? असा खोचक सवाल नागरिक विचारत आहेत. “रस्त्यावरून रेल्वे नेताना पाहून एकीकडे हसू आलं आणि दुसरीकडे वाईटही वाटलं. आमच्या पिढीचे रेल्वेचे स्वप्न कधी सत्यात उतरणार?” अशी भावना आंबेगाव तालुका मित्र मंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक दत्तात्रय भालेराव यांनी व्यक्त केली. सदर रेल्वेचा डबा हा नाशिक जंक्शनमध्ये नेला जात असावा, असा प्राथमिक अंदाज नागरिकांमधून व्यक्त केला जात असून, कंटेनरवरून जाणारी ही रेल्वे पाहून आंबेगावकर व जुन्नरकरांना क्षणिक आनंदाचा अनुभव आला आहे.

**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ई-निविदा सूचना

महावितरणकडे नोदणीकृत असलेल्या नामांकित व अनुभवी कंत्राटदार यांचे कडून पिंपरी विभागा अंतर्गत खालील सामानांचा पुरवठा / कामे करण्यासाठी ई -निविदा मागविण्यात येत आहेत.

| कामाचा तपशील | निविदा क्रं. का.अ. /पिंपरी/२६-२७ | निविदा रक्कम रू. लाख |
|---|---|---|
| Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/ Clusters having below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than **Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council, Nagar Parishad and Nagar Panchayat.**) under Kharalwadi/ Dapodi/ Hinjawadi/ Chinchwad/ Sangavi sub division under Pimpri Division to be done using Mahavitaran Mobile App, IR/ RFHHUs, Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises. | 1)T-07 | 186.05 |
| | 2)T-08 | 43.79 |
| | 3)T-09 | 180.72 |
| | 4)T-10 | 57.80 |
| | 5)T-11 | 181.67 |

अधिक तपशीलासाठी कृपया https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळाला भेट दयावी.

HO PR NO 222/26 dt.22.09.26 — कार्यकारी अभियंता, पिंपरी विभाग

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चित्रकला ही अभिनयापेक्षा कठीण कला

**पुणे : दैनिक संध्या**

कोर्या कॅनव्हासवर व्यक्त होणे, ही अवघड कला असल्याचे मत ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांनी येथे व्यक्त केले. मी अभिनेता आहे. मला अभिनयाची कला येते. मात्र, चित्रकला ही त्याहून कठीण कला आहे, असे ते म्हणाले. पुणे फेस्टिव्हल अंतर्गत ॲड. अनुराधा भारती प्रस्तुत आकृती ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला प्रदर्शनाचे उद्‌घाटन मोहन जोशी यांच्या हस्ते बुधवारी झाले. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, ज्येष्ठ चित्रकार चिंतामणी हसबनीस, ॲड.अनुराधा भारती हे मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व चित्रकारांचा प्रशस्तीपत्र देऊन यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुणे फेस्टिव्हलमध्ये आकृती ग्रुपचे हे सलग १९ वे चित्रप्रदर्शन असून, बुजुर्ग चित्रकार पद्मविभूषण सतीश गुजराल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या अमूर्त चित्रशैलीचा सन्मान म्हणून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शन २४ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते रात्री ८ या वेळात सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. ॲड. अनुराधा भारती प्रदर्शनाविषयी म्हणाल्या, 'या प्रदर्शनात सुमारे ८० चित्रकारांच्या चित्रकृतींचा समावेश आहे. प्रामुख्याने अमूर्त चित्रशैलीला प्राधान्य देण्यात आले आहे. शंभरपेक्षा अधिक चित्रे प्रदर्शनात रसिकांना बघता येतील. ज्येष्ठ चित्रकार सतीश गुजराल यांच्या विलक्षण कलाप्रवासाचे दर्शन या निमित्ताने घडावे, गुजराल यांचा सात दशकांचा चित्रवारसा, त्यांनी साकारलेली भव्य भित्तिचित्रे आणि त्यांची कालातीत कलादृष्टी यांना उजाळा मिळावा तसेच नव्या पिढीसमोर त्यांची चित्रशैली यावी, या उद्देशाने हे चित्रप्रदर्शन गुजराल यांच्या स्मृतीला अर्पण केले आहे. चित्रकारांमध्ये एसएनडीटी कॉलेजच्या २० विद्यार्थिनी तसेच श्रीमती शकुंतला हेमराज मुथा चित्रकला महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे. कृष्णकुमार गोयल म्हणाले, 'गुजराल यांच्यासारख्या ज्येष्ठ चित्रकारांच्या स्मृतींचे जागरण या प्रदर्शनाच्या निमित्ताने होत आहे आणि युवा चित्रकारांचा सहभाग प्रदर्शनात आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. हसबनीस यांनी मोहन जोशी यांच्यासोबतच्या भेटीला उजाळा दिला. 'पुणे फेस्टिव्हलच्या वतीने चित्रकलेला प्रोत्साहन मिळत आहे, याचा आनंद वाटतो', असे ते म्हणाले. मोहन जोशी यांनी प्रदर्शनाच्या उद्‌घाटनानंतर प्रत्येक चित्रकाराशी त्याच्या चित्रापाशी जाऊन संवाद साधला. डॉ. श्रुती दातार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सतीश देसाई यांनी आभार मानले।.

### गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी महावितरणची यंत्रणा सज्ज; पथके तैनात

**पुणे : दैनिक संध्या**

शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीदरम्यान वीजपुरवठा सुरळीत व सुरक्षित राहावा, यासाठी महावितरणने व्यापक नियोजन केले आहे. पर्वती, शिवाजीनगर आणि रास्तापेठ या तीन विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची पथके मिरवणूक मार्गांवर तैनात करण्यात आली असून, दि. २४ ते २६ सप्टेंबर तसेच मानाच्या गणपतींचे विसर्जन पूर्ण होईपर्यंत ही यंत्रणा कार्यरत राहणार आहे. पर्वती विभाग : महात्मा फुले मंडई कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत असून, वरिष्ठ अधिकारी सर्व कर्मचाऱ्यांच्या संपर्कात राहतील. विभागात एकूण १५ पथके, प्रत्येकी ३ कर्मचारी असे कार्यरत असतील. नियंत्रण कक्ष क्रमांक : ७८७५७६७२२७. शुक्रवारपेठ-सदाशिवपेठ शाखेअंतर्गत मंडई परिसर, तुळशीबाग, दगडूशेठ गणपती परिसर, कुमठेकर रोड, एस.पी. कॉलेज, अलका चौक, रामेश्वर चौक ते मामलेदार कचेरी या भागांत ६ पथके, तर पेरुगेट चौकात आपत्कालीन पथक तैनात आहे. नवीपेठ-दत्तवाडी शाखेअंतर्गत न्यू इंग्लिश स्कूल, गांजवे चौक, दांडेकर पूल, जनता वसाहत, सिंहगड रोड-म्हात्रे पूल-म्हसोबा चौक परिसरात ९ स्वतंत्र पथके नियुक्त आहेत. शिवाजीनगर विभाग : मोदी गणपती, शिवाजीनगर गावठाण आणि खडकी या तीनही शाखांमध्ये स्वतंत्र पथके नेमली आहेत. तक्रार क्रमांक : ७८७५७६७५३१. मोदी गणपती शाखेअंतर्गत समाधान चौक ते गणपती चौक, कुंठे चौक, शगुन चौक, चित्रशाळा चौक, गरुड गणपती चौक ते अलका चौक परिसरात पथके आहेत. शिवाजीनगर शाखेअंतर्गत पोलीस ग्राऊंड, कॉर्पोरेशन, वाकडेवाडी-संचेती हॉस्पिटल, पाटील इस्टेट परिसरात पथके तैनात आहेत. खडकी शाखेअंतर्गत सागर हॉटेल ते सोनार गल्ली, माऊली चौक ते राजमोल चौक, कँटोन्मेंट हॉस्पिटल ते गाडी अड्डा, भाटिया लॉज ते राम मंदिर विसर्जन मार्गांवर पथके नेमली आहेत. यासोबतच लक्ष्मीरोडवर झुडिओ शेजारी दरवर्षीप्रमाणे यावेळीही देखरख कक्ष महावितरण उभारणार आहे. या देखरेख कक्षातून वरिष्ठ अधिकारी मिरवणूकीवर शेवटपर्यंत देखरेख ठेवून परिस्थिती हाताळतात. रास्तापेठ विभाग : समाधान चौक, लाल महाल चौक आणि पासोड्या विठोबा मंदिर चौक येथे.

### ‘द फोर सुपरस्टार’ने रंगली सुरेल मैफल

**पुणे : दैनिक संध्या**

३८व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे ‘द फोर सुपरस्टार’ या विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देवानंद, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आणि ऋषी कपूर यांच्यावर चित्रित झालेल्या लोकप्रिय गीतांची सुरेल मैफल यावेळी सादर करण्यात आली. या गाण्यांना रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत कार्यक्रमाचा आनंद लुटला. ‘जॉनी मेरा नाम’, ‘अगर तुम ना होते’, ‘ओ साथी रे’, ‘हम ने तुम को देखा’, ‘छुप गये सारे’, ‘तेरे चेहरे से नजर’, ‘बचना ऐ हसीनो’, ‘गाता रहे मेरा दिल’, ‘ओ मेरे दिल के चैन’, ‘चला जाता हूँ’, ‘डफलीवाले’, ‘जीवन के हर मोड़’, ‘परदा है परदा’, ‘एक हसीना थी’, ‘प्यार हमें किस मोड़ पे’, ‘जय जय शिवशंकर’, ‘ओ मेरे राजा’, ‘सलाम-ए-इश्क’, ‘मेरे सपनों की रानी’, ‘जिंदगी इक सफर’, ‘यारी है ईमान’, ‘डॉन’, ‘परदेसिया’, ‘दोस्ताना’ आदी लोकप्रिय गीत सादर करण्यात आले. या सदाबहार गीतांनी जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या आठवणींना उजाळा देत रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमादरम्यान पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते सहभागी कलाकारांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू, श्रीकांत कांबळे, अतुल गोंजारी, सचिन आडेकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख गायिका तेजस्विनी पाहुजा, हिम्मत पंड्या, चंद्रशेखर महामुनी आणि राधिका अत्रे यांनी विविध गीते सादर केली. अनिल करमरकर, अमन सय्यद, आसिफ खान, नंदु डेव्हिड, हर्षद गणबोटे, शाम चंदन आणि स्वयम् सोनवणे यांनी वाद्यसाथ केली. वाद्यवृंद संचलन व गिटार मुकेश देढिया यांनी केले, तर निवेदनाची जबाबदारी महेश गायकवाड यांनी सांभाळली.

# पुणे फेस्टिव्हलमध्ये ‘हास्य जत्रे’चा हास्यकल्लोळ

■ पुणे(दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या उत्साहाने भारलेल्या पुण्यातील रसिकांना विनोदाची मेजवानी देत एमएचजे लाईव्ह हा कार्यक्रम पुणे फेस्टिव्हलअंतर्गत गणेश कला क्रीडा रंगमंदिरात उत्साहात पार पडला.खचाखच भरलेल्या सभागृहात कलाकारांनी सादर केलेल्या विविध विनोदी प्रसंगांना रसिकांनी शिट्ट्या, टाळ्या आणि ‘वन्स मोअर’च्या घोषणांनी उत्स्फूर्त दाद दिली.

पुण्याची अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर हिने रंगमंचावर आगमन करताच, ‘काय पुणेकरांनो, गणपतीचे दर्शन झाले का? कोणते गणपती पाहिले?’ असा आपुलकीचा संवाद साधत वातावरणात रंग भरला. गणेशोत्सवाची सुरुवात ज्या पुण्यातून होते, त्याच पुण्यात एमएचजे लाईव्ह सादर करताना आनंद होत असल्याची भावना तिने व्यक्त केली.

समीर चौघुले, प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, वनिता खरात, चेतना भट, शिवाली परब, प्रियदर्शनी इंदलकर, पृथ्वी प्रताप, ओंकार भोजने, प्रथमेश शिवलकर, ओंकार राऊत, दत्तू मोरे, अमीर हडकर, सुनील डांगे, दशरथ सिरसट, गणेश सागडे आणि अमित फाळके या कलाकारांनी विविध विनोदी प्रसंग सादर केले. ओंकार राऊत आणि चेतना भट यांच्या ५००व्या प्रयोगाचे औचित्यही यावेळी साधण्यात आले. मात्र, समीर चौघुले यांनी या ‘५००व्या प्रयोगात’ विनोदी पद्धतीने विघ्न आणल्याचा प्रसंग विशेष रंगला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ‘मामा-मामी’ या लोकप्रिय पात्रांनी भाच्याच्या लग्नातील पूजेचा प्रसंग नाट्यरूपात सादर केला. शब्दांचे फुलोरे, अचूक वेळ साधून केलेले टोमणे आणि आवाजातील चढ-उतार यामुळे सभागृहात हास्याचे फवारे उडाले. नम्रता संभेराव यांचे ‘लॉली’ हे पात्र आणि प्रसाद खांडेकर यांच्यातील मनःशांती केंद्रातील जुगलबंदीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली.

ओंकार राऊत, पृथ्वी प्रताप आणि वनिता खरात यांनी ‘डाएटिशियन क्लिनिक’मधील पहिला रुग्ण हा प्रसंग सादर केला. त्यानंतर समीर चौघुले, प्रसाद खांडेकर, प्रियदर्शनी इंदलकर, शिवाली परब आणि नम्रता संभेराव यांच्या‘कोळी फॅमिली’च्या स्क्रिप्टने पुन्हा एकदा प्रेक्षकांची वाहवा मिळवली.



यंदा महोत्सवाच्या माध्यमातून वर्षभरासाठी नेत्रदान मोहीम हाती घेण्यात आल्याची माहिती देण्यात दिली. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले, “१९८९ मध्ये सुरेश कलमाडी यांनी पुणे फेस्टिव्हल सुरू केला. यंदा महोत्सवात विविध ठिकाणी ५३ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आयुष्यातील धावपळीमध्ये एखादा विनोद मनाला विश्रांती देतो. एमएचजे लाईव्ह हा केवळ विनोदाचा कार्यक्रम नसून जीवनाशी जोडलेला आनंद आणि शिकवण देणारा अनुभव आहे.”

दरम्यान, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘मांजर’ चित्रपटातील कलाकार तेजस राऊत, ओंकार भोजने आणि वैष्णवी आंधळे यांनी यावेळी चित्रपटाची माहिती दिली. यावेळी मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, खासदार धनंजय महाडिक यांच्या पत्नी अरुंधती महाडिक, आयकर विभागाचे अधिकारी नितीन वाघमोडे, अविनाश पाटील, नगरसेवक सुनील शिंदे, विश्वस्त मोहन टिल्लू आदी उपस्थित होते

## ‘डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणरत्न’ पुरस्कार वितरण सोहळा रविवारी

■ पुणे (दै. संध्या)

ग्रीन वर्ल्ड आणि जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी रविवार, दि.२७ सप्टेंबर २०२६ रोजी ‘डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणरत्न’ तसेच ‘आयकॉनिक लीडर ऑफ महाराष्ट्र’ पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस चे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आणि आयोजक व लेखक गौतम कोतवाल यांनी दिली.

पुरस्कार वितरण सोहळा नऱ्हे येथील ॲड. शार्दुलराव सुधाकरराव जाधवर, शैक्षणिक संकुल क्रमांक २ येथे होणार आहेत. ‘गौरव कर्तृत्वाचा’ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य, बँकिंग, कृषी, प्रशासन आणि विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्याच्या




निमित्ताने रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी तीन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता होणाऱ्या प्रथम सत्रात मंत्रालय सचिव विकास देशमुख, ऊर्जा कुतवळ फूड प्रॉडक्ट्स चे प्रकाश कुतवळ, प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर आणि माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या सत्रात ‘ग्रीन वर्ल्ड, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणरत्न’ पुरस्काराने नवनाथ ढवळे, जयश्री पलांडे आणि डॉ. शिवाजीराव पोखरकर यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच ‘आयकॉनिक लीडर ऑफ महाराष्ट्र’ पुरस्काराने विजय कोद्रे आणि अनिल तुपे यांना गौरविण्यात येणार आहे. दुसरे सत्र दुपारी १.३० वाजता असून या कार्यक्रमाला जमाबंदी व संचालक भूमी अभिलेख अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर खिलारे, कृषी उद्योजक व कृषी आणि कृषी संलग्न अभ्यासाचे प्रसारक उदय बोरावके, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या सोहळ्यात श्रीरामपूर रयत शैक्षणिक

## 'दगडूशेठ' गणपतीला १५१ किलो मोतीचूराच्या भव्य मोदकाचा नैवेद्य

■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत 'दगडूशेठ' हलवाई गणपतीला तब्बल १५१ किलो मोतीचूराचा भव्य मोदकाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. जालना येथील दहिवाळआणि शहाणे परिवारातर्फे हा मोदक अर्पण करण्यात आला असून तो तीन दिवसात साकारण्यात आला.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३४ व्या वर्षी उत्सव मंडपात हा भव्य मोदक टेम्पोतून आणण्यात आला. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जालना जिल्ह्यातील परतुर येथील एकनाथराव दहिवाळ यांच्यातर्फे दगडूशेठ गणपतीला हा १५० किलो मोदक सुजाता एकनाथराव दहिवाळ व अमोल रंगनाथराव शहाणे, दिपाली अमोल शहाणे, साक्षी रोहित शहाणे, माहेश्वरी मायरा यांच्यातर्फे



अर्पण करण्यात आला. मोतीचूर लाडू, तूप, साखर, ड्रायफ्रुट, केशर असे यामध्ये वापरण्यात आले आहे. सलग तीन दिवस तब्बल ६ कारागिरांच्या मदतीने हा मोदक तयार केला. साक्षी रोहित शहाणे, अमोल शहाणे आणि शहाणे परिवारातर्फे दगडूशेठ गणपतीला नवस करण्यात आला होता. तो पूर्ण झाल्यानंतर या परिवाराने बाप्पाला हा नैवेद्य अर्पण केला. नैवेद्य दाखविल्यानंतर प्रसाद म्हणून गणेशभक्तांना याचे वाटप करण्यात आले.

## कोणार्क सूर्य मंदिर रथातून निघणार मंडई गणपतीची विसर्जन मिरवणूक

■ पुणे (दै. संध्या)

अखिल मंडई मंडळाच्या गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी निघणार आहे. यंदा मंडई गणपतीची विसर्जन मिरवणूक कोणार्क सूर्य मंदिर रथातून निघणार आहे. सुमारे ३२ फूट उंचीच्या या रथावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी दिली.

अखिल मंडई मंडळाच्या गणेशोत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. यंदाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी कोणार्क सूर्य मंदिराच्या वास्तुशैलीवर आधारित रथ साकारण्यात आला आहे. सुमारे ३२ फूट उंच असलेल्या या रथावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, रथ हे मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण असणार आहे.

ऐश्वर्याचे प्रतीक हत्ती, शौर्याचे प्रतीक सिंह प्रतिकृती रथावर असणार आहे.



गणपतीच्या मागे तेजाचे प्रतीक सूर्य साकारण्यात आला आहे. विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यवृंद आणि वाद्य पथकांचा सहभाग असणार आहे. मिरवणूकीच्या अग्रभागी जयंत नगरकर बंधू यांचे नगारावादन त्यामागे न्यू गंधर्व बँड तसेच शिवगर्जना पथकाचे वादन मिरवणूकीत होणार आहे. कलादिग्दर्शक विशाल ताजणेकर यांनी रथ साकारला आहे.

## पर्यावरण तंत्रज्ञानाच्या अभ्यासासाठी सागर अहिवळे चेक प्रजासत्ताकच्या दौऱ्यावर

■ पुणे (दै. संध्या)

जल व कचरा व्यवस्थापन, सर्क्युलर इकॉनॉमी आणि शाश्वत तंत्रज्ञानातील आधुनिक पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी ‘ग्रीन सोल्यूशन’चे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवळे चेक प्रजासत्ताकच्या दौऱ्यावर आहेत. चंदीगडचे मुख्य सचिव एच. राजेश प्रसाद यांच्या नेतृत्वात गेलेल्या या भारतीय उद्योगांच्या शिष्टमंडळात भारतातील केवळ १० व्यक्तींचा सहभाग असून, महाराष्ट्रातून सागर अहिवळे यांच्यासह निव बायोरूट्स सस्टेनेबल फ्युएल्सचे स्वप्नील गावकर हेही सहभागी आहेत. हा दौरा २५ सप्टेंबरपर्यंत असून, यामध्ये प्राग, झ्लिन आणि ओस्त्रावा येथे विविध बैठका व चर्चांमध्ये ते सहभागी होणार आहेत. या दौऱ्यात जलशुद्धीकरण, सांडपाणी प्रक्रिया, कचरा व्यवस्थापन आणि संसाधन पुनर्वापरातील प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यात येत आहे. चेक प्रजासत्ताकमधील आधुनिक तंत्रज्ञान भारतात




आणण्याबरोबरच भारतीय उद्योगांसाठी संयुक्त संशोधन आणि व्यवसाय सहकार्याच्या संधी निर्माण करण्यावर अहिवळे यांचा भर आहे. या मोहिमेमुळे जल व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि चक्रीय अर्थव्यवस्था उपक्रमांमध्ये भारतीय आणि चेक भागधारकांमध्ये व्यावहारिक भागीदारीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे.भारतीय उद्योगांना शाश्वततेच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी चेक प्रजासत्ताकमधील तंत्रज्ञान संस्था व उद्योगांशी संपर्क वाढविणे, तसेच ‘बी टू बी’ भागीदारीच्या संधी शोधणे हा या सहभागाचा प्रमुख उद्देश आहे. जलसंवर्धन, पाण्याचा पुनर्वापर, सांडपाणी प्रक्रिया तसेच कचऱ्यातून ऊर्जा व संसाधन निर्मितीच्या क्षेत्रातील नव्या पद्धतींचा अभ्यास करून त्यांचा भारतातील उपयोग तपासला जात आहे. राजेश प्रसाद यांनी भारतात ‘जल अर्थव्यवस्था’ बळकट करण्याची गरज व्यक्त केली आहे. रोपार, चितकारा विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासनातील अधिकारी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

# श्री वक्रतुंड रथातून 'दगडूशेठ' गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक

■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३४ व्या वर्षानिमित्त आयोजित गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक अनंत चतुर्दशीला शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर रोजी थाटात निघणार आहे. यंदा श्री वक्रतुंड रथामध्ये दगडूशेठ चे गणपती बाप्पा विराजमान होणार असून आकर्षक विद्युतरोषणाईने हा रथ उजळून निघणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

सलग चौथ्या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दुपारी ४ वाजता बेलबाग चौकातून मिरवणुकीमध्ये सहभागी होणार आहे. यंदाची प्रतिकृती असलेल्या वृंदावन मधील प्रेम मंदिराच्या विषयाप्रमाणे सांगता मिरवणूक रथाची मांडणी करण्यात आली आहे. मंदिर वास्तुकलेने प्रेरित असा हा रथ तयार करण्यात आला आहे. रथाची संकल्पना भारतीय मंदिर वास्तु केलेवर आधारित असून त्यात पारंपरिक शिल्पकला आणि आधुनिक फॅब्रिकेशनचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे.

रथाचे मुख्य आकर्षण म्हणजे त्याचे नक्षीदार स्तंभ. रथावर एकूण ८ स्तंभ असून त्यातील चार स्तंभांवर भगवान विष्णू आणि भगवान कुबेर यांच्या प्रतिमा साकारण्यात आल्या आहेत. रथाच्या वरच्या भागात शिखर, घुमट आणि जाळीदार नक्षीकाम देखील करण्यात आले आहे. रथाचा आकार १५ बाय १५ फूट असून उंची २१ फूट इतकी आहे. याशिवाय रथावर आकर्षक झुंबरे, एलईडी व पार लाईटचे फोकस लावण्यात येणार आहेत.

सांगता मिरवणुकीबाबत माहिती देताना सुनील रासने म्हणाले, मिरवणुकीत जय गणेश अमली पदार्थ मुक्त भारत अभियान जनजागृती करणारा मानवसेवा रथ अग्रभागी असून त्यामध्ये विनायक आणि रोहन देवळकर यांचा चौघडा व प्रमोद गायकवाड यांचे सनई वादन देखील होणार आहे.

त्यामागे स्वरूपवर्धिनीचे पथक, प्रभात बँड, दरबार बँड आणि केरळचे चेंदा मेलम पथक असा लवाजमा असेल. तसेच पुरुष भाविकांसह महिला गणेशभक्त देखील मोठया संख्येने सहभागी होणार आहेत.



## थोडक्यात पण महत्वाचे



### गणेशोत्सवात राबणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील रस्ते, मंडप परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी भाविकांची गर्दी वाढत असताना कचऱ्याचे प्रमाणही वाढते. अशा वेळी उत्सवाचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्वच्छता कर्मचारी सातत्याने पार पाडतात. त्यांच्या श्रमाची दखल घेत शनिपार मंडळ ट्रस्टतर्फे २२ महिला आणि २८ पुरुष अशा ५० स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने यांच्या हस्ते महिला कर्मचाऱ्यांना साडी-चोळी, तर पुरुष कर्मचाऱ्यांना पोशाख देऊन गौरविण्यात आले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष समीर गायकवाड उपस्थित होते. समीर गायकवाड म्हणाले, गणेशोत्सवाच्या काळात नागरिक आणि भाविकांची मोठी वर्दळ असते. या काळात परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचारी सातत्याने मेहनत घेतात. उत्सव सुरळीत पार पडण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे ही मंडळाची सामाजिक जबाबदारी आहे, यासाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### प्रतिभा महाविद्यालयात प्रातिभा जॉब फेअर २०२६, रोजगाराच्या विविध संधी : डॉ .शहा

**पिंपरी : : दैनिक संध्या**



चिंचवड येथील प्रातिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने प्रतिभा महाविद्यालय येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'प्रातिभा जॉब फेअर २०२६' या रोजगार मेळाव्याचे आयोजन मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे एम्प्लॉयमेंट ऑफिस तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व पुणे येथील उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या सहकार्याने हा मेळावा होणार आहे. प्रातिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचा हा ११ वा मेगा जॉब फेअर असून, विविध क्षेत्रातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच राष्ट्रीय स्तरावरील कंपन्या सहभागी होणार आहेत. यामध्ये ५० हून अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग अपेक्षित असून, सुमारे १,००० नोकरीच्या संधी जागेवर उपलब्ध होणार असल्याची माहिती प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे संस्थापक सचिव डॉ . दीपक शहा यांनी दिली आहे. या रोजगार मेळाव्यात फ्रेशर्स तसेच अनुभवी उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. बी.कॉम., बीबीए, बीसीए, बी.एससी., एम.कॉम., एमबीए, एमसीए, एम.एससी., बीई, बी.टेक., एमई, एम.टेक., अभियांत्रिकी डिप्लोमा, फार्मसी आणि आयटीआय अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. मागील रोजगार मेळाव्यांना दरवर्षी १८० हून अधिक कंपन्यांचा सहभाग, सुमारे १० ते १५ हजार इच्छुक उमेदवारांची उपस्थिती आणि ५ हजारांहून अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. या मेळाव्यासाठी प्रवेश व नोंदणी विनामूल्य असून अधिक माहितीसाठी 8600100942 या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करणे अनिवार्य असुन इच्छुक उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे संस्थापक सचीव व जॉब फेअरचे मुख्य आयोजक डॉ . दीपक शहा यांनी केले आहे.

### बेल्हे परिसरात पावसाची दमदार हजेरी

**नारायणगाव : दैनिक संध्या**



गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने अखेर बेल्हे आणि परिसरात मंगळवारी दुपारच्या सुमारास जोरदार पुनरागमन केले. विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह आलेल्या या मुसळधार पावसामुळे संपूर्ण परिसरातील रस्ते जलमय झाले असून शेतशिवारात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले.या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना नवसंजीवन मिळाले असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसांपासून बेल्हे आणि परिसरात कडक ऊन पडत होते. असह्य उकाडा आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले होते. सर्वजण पावसाची चातकासारखी वाट पाहत होते. मंगळवारी सकाळपासूनच हवेत प्रचंड उष्मा जाणवत होता. मात्र, दुपारच्या सुमारास अचानक हवामानात बदल झाला. आकाशात काळेभोर ढग दाटून आले आणि संपूर्ण परिसरात अंधारून आले. काही वेळातच विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. अचानक सुरू झालेल्या या वेगवान आणि जोरदार पावसामुळे नागरिकांची चांगलीच धांदल उडाली. अवघ्या काही तासांतच परिसरातील मुख्य रस्ते, सखल भाग आणि शेतांमध्ये पाण्याचे लोट वाहू लागले. अनेक ठिकाणी वाहतुकीचा वेग मंदावला होता. विशेषतः शेतशिवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. हा पाऊस पिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि वेळेवर पडलेला मानला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाअभावी शेतातील पिके सुकून गेली होती, ज्यामुळे शेतकरी चिंतेत होते. मात्र, मंगळवारी झालेल्या या दमदार पावसामुळे पिकांना आवश्यक असणारे पाणी मिळाल्याने पिके टवटवीत झाली आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळत असून, शेतीच्या कामांना आता पुन्हा वेग येणार आहे. या मुसळधार पावसामुळे वातावरणात अचानक गारवा निर्माण झाला आहे. गेले अनेक दिवस प्रचंड उष्णतेचा सामना करणाऱ्या स्थानिक नागरिकांना आणि लहान मुलांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला असून उकाड्यापासून त्यांची सुटका झाली आहे.

### गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

**नारायणगाव : दैनिक संध्या**

बोरी बुद्रुक येथील श्री संभाजी विद्यालयामध्ये शिकणाऱ्या पाच हुशार आणि गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. भारताचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यसभेच्या खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि विशेष पुढाकारातून हा स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. बोरी बुद्रुक पर्यटन व संवर्धन समितीचे अध्यक्ष रंजननाना जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सायकली सुपूर्द करण्यात आल्या. हा सोहळा विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाप्रसंगी शालेय व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सतीश जाधव, ग्रामोन्नती मंडळाचे सचिव अशोक कोरडे, संजय जाधव, प्रगतीशील शेतकरी अमोल कोरडे, अर्जुन जाधव आणि बब्बू जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मोफत सायकली उपलब्ध करून देण्यासाठी केदार तपस्वी यांनी विशेष प्रयत्न केले.

# वायसीएममधील औषधटंचाई तातडीने दूर करा : नगरसेवक जगताप

■ **पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना डॉक्टरांनी लिहून दिलेली आवश्यक औषधे रुग्णालयाच्या औषध वितरण केंद्रात उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. औषधांची ही कमतरता तातडीने दूर करून रुग्णांना सर्व आवश्यक औषधे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी भाजपचे नगरसेवक ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जगताप यांनी केली आहे.

याबाबत जगताप यांनी मंगळवारी (दि. २२) महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, वायसीएमचे अधिष्ठाता राजेंद्र वाबळे यांना निवेदन दिले. वायसीएम रुग्णालयात शहरासह आसपासच्या परिसरातील हजारो सर्वसामान्य, गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्ण उपचारांसाठी येतात. मात्र, डॉक्टरांनी लिहून दिलेली अनेक औषधे वितरण केंद्रात मिळत नसल्याने रुग्णांना खासगी औषध विक्रेत्यांकडून महागड्या दराने ती खरेदी करावी लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांच्या उपचारांमध्ये खंड पडून आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. औषधांच्या कमतरतेमुळे कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये किंवा रुग्णाच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत. महापालिकेकडून आरोग्यसेवेसाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद केली जात असतानाही रुग्णालयात अत्यावश्यक औषधे उपलब्ध नसणे चिंताजनक आहे. डॉक्टरांनी औषध सूचीतील औषधे लिहून दिल्यानंतरही ती वितरण केंद्रात मिळत नसतील, तर औषधांची खरेदी, साठवणूक आणि वितरण प्रक्रियेची तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे जगताप यांनी नमूद केले.

#### स्वतंत्र तक्रार निवारण कक्षाची मागणी

औषधांबाबत रुग्णांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी रुग्णालयात स्वतंत्र मदत व तक्रार निवारण कक्ष सुरू करावा. औषध खरेदी आणि वितरण व्यवस्थेवर नियमित देखरेख ठेवण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या प्रकरणात केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल सात दिवसांच्या आत देण्यात यावा, अशी मागणी जगताप यांनी केली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल न घेतल्यास रुग्ण आणि नागरिकांच्या हितासाठी संबंधित वरिष्ठ विभाग व राज्य शासनाकडे तक्रार करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

वायसीएम रुग्णालयातील उपलब्ध आणि अनुपलब्ध औषधांच्या साठ्याची तातडीने तपासणी करावी. दैनंदिन उपचारांसाठी आवश्यक असलेल्या सर्व औषधांची आपत्कालीन पद्धतीने खरेदी करून ती रुग्णांना रुग्णालयातूनच विनामूल्य द्यावीत. मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग, बालरोग आणि अन्य गंभीर आजारांवरील औषधांचा पुरेसा साठा कायम ठेवावा, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. औषध वितरण केंद्राबाहेर उपलब्ध आणि अनुपलब्ध औषधांची अद्ययावत यादी दररोज प्रसिद्ध करावी. औषधांच्या कमतरतेस जबाबदार असलेले अधिकारी, पुरवठादार अथवा कंत्राटदार यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. रुग्णांना बाहेरून औषधे विकत घेण्यास सांगितले जात असल्यास संबंधित विभागाकडून लेखी स्पष्टीकरण घ्यावे, असेही जगताप यांनी म्हटले आहे.

## पाझर तलावांच्या संरक्षणासाठी प्रशासन कठोर

■ **नाझरे सुपे पुरंदर : (दै. संध्या)**



ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक गडद होण्यापूर्वीच प्रशासनाने कंबर कसली आहे. पाझर तलावांवरील अनधिकृत पाणी उपशाला आळा घालण्यासाठी आणि पुढील ८ ते ९ महिन्यांच्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जल व्यवस्थापन समितीने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. पाझर तलावांचे पाणी हे केवळ भूजल पातळी वाढवण्यासाठी असून त्यातून थेट उपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या महत्त्वपूर्ण बैठकीला समितीचे अध्यक्ष वीरधवल जगदळे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सभापती कृषी व पशुसंवर्धन विभाग, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग, ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता गौरव बोरकर आणि जिल्हा जलसंधारण अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सहा महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.

*१. अनधिकृत उपशावर तात्काळ बंदी :* ज्या पाझर तलावांवरून शेतीसाठी पाणी उपसण्याची कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नाही, अशा सर्व ठिकाणचा थेट पाणी उपसा तात्काळ प्रभावाने बंद करण्यात यावा. नियम धाब्यावर बसवून मोटारींद्वारे पाणी उपसणाऱ्यांवर फौजदारीसह कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

*२. रब्बी हंगामाबाबत पूर्वसूचना :* अनेक वेळा उशिरा निर्णय झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे रब्बी हंगामात बागायती पिकांची पेरणी करू नये, याबाबत ग्रामपंचायतींनी दवंडी देऊन, बैठका घेऊन शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करावी, जेणेकरून पाण्याअभावी पिके जळून जाणार नाहीत.

*३. भरारी पथकाद्वारे कारवाई :* पाझर तलावांतील पाणीसाठ्याच्या सुरक्षिततेसाठी विशेष मोहीम राबवावी. ज्या ठिकाणी ठराविक लोकांकडून बेकायदेशीरपणे पाणी उपसा सुरू आहे, तेथे भरारी पथके पाठवून पंप, पाईपलाईन आणि इतर साहित्य जप्त करावे आणि उपसा कायमचा रोखावा.

*४. नैसर्गिक वापरावर भर :* पाझर तलाव हा थेट शेतीसाठी नसून त्याचे पाणी जमिनीत मुरून खालच्या भागातील विहिरींची पातळी वाढवण्यासाठी असते. त्यामुळे तलावातून थेट उपसा ग्राह्य धरला जाणार नाही, तर केवळ विहिरींच्या माध्यमातूनच पाणी वापर करण्यास परवानगी असेल.

*५. दीर्घकालीन पाणी आराखडा :* पुढील आठ ते नऊ महिन्यांचा काळ हा अत्यंत जिकिरीचा असणार आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरांना चाऱ्या-पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी आतापासूनच प्रत्येक गावाचा पाणी आरक्षण आणि नियोजन आराखडा तयार करावा. *६. साप्ताहिक पाणी पातळी सर्वेक्षण :* गेल्या तीन आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने अनेक पाझर तलावांतील पाण्याची पातळी ५ ते ६ फुटांनी खाली गेली आहे.

## विनायक नवयुग मित्र मंडळातर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फी मदत



■ **पुणे : (दै. संध्या)**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्टतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि फी मदत निधी देण्यात आला. बाल शिक्षण शाळा, एमव्हीएम रामचंद्र राठी शाळा तसेच आनंद वन सामाजिक संस्थेतील गरजू विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ देण्यात आला. गणेशोत्सव सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा असून, गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचा मंडळाचा उपक्रम स्तुत्य आहे, असे मत पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केले.

भांडारकर रस्त्यावरील मंडळाच्या गणेश मंडपात हा कार्यक्रम झाला. यावेळी किशोर सरपोतदार, मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय फंड आणि स्वागताध्यक्ष नगरसेवक सुनील पांडे-लोहगावकर, अभिजीत मोडक, वरुण जकातदार, ऋषिकेश आर्य, गुणेश साने, चैतन्य रेड्डी, श्रीधर खांडेकर, दिनेश अंभोरे, योगेश जोगळेकर उपस्थित होते.

नवल किशोर राम म्हणाले, उत्सव देशभरात विविध ठिकाणी साजरा होत असला, तरी पुण्याच्या गणेशोत्सवाची वेगळी ओळख आहे. ऐतिहासिक गणेश मंडळांच्या माध्यमातून गणेशोत्सवात सकारात्मक ऊर्जा अनुभवता येते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला सुरुवात झाली होती.

## गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये परदेशी पर्यटक सहभागी होणार

■ **मुंबई : (दै. संध्या)**

अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईतील ऐतिहासिक गिरगाव चौपाटी येथे होणाऱ्या भव्य गणेश विसर्जन सोहळ्याचा अनुभव परदेशी पर्यटकांना घेता यावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाद्वारे विशेष दालन उभारण्यात येणार आहे. या विशेष दालनाच्या माध्यमातून परदेशी पर्यटकांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, गणेशोत्सवाचे ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्व तसेच विसर्जन सोहळ्याचे भव्य स्वरूप जवळून अनुभवता येणार आहे.

गणेश विसर्जनाचा हा भव्य सोहळा प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्यटक गिरगाव चौपाटी येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्यांना गणपती मिरवणुकीचे दर्शन घेण्याबरोबरच गणरायाची पूजा, आरती आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि भक्तिमय वातावरणामध्ये पर्यटकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडणार आहे.

मुंबईतील गणेशोत्सवाला लाभलेली व्यापक लोकसहभागाची परंपरा, विविध गणेश मंडळांची सजावट, मिरवणुका आणि विसर्जन सोहळा यामुळे या उत्सवाला विशेष वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे. या सांस्कृतिक अनुभवाचे नियोजनबद्ध पद्धतीने पर्यटकांसमोर सादरीकरण करण्याच्या दृष्टीने विशेष दालनाची संकल्पना राबविण्यात आली आहे. या माध्यमातून राज्यातील सांस्कृतिक पर्यटनाला चालना देण्याबरोबरच महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. श्री. शंभूराज देसाई, पर्यटन मंत्री, महाराष्ट्र शासन , "समृद्ध सांस्कृतिक परंपरा हे राज्याच्या पर्यटनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील विविध सांस्कृतिक परंपरा आणि उत्सवांचा आंतरराष्ट्रीय पर्यटकांना परिचय करून देण्याच्या दृष्टीने पर्यटन विभागाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त जेजुरीत विद्यार्थ्यांना मदतीचा हात

■ **नाझरे सुपे पुरंदर : (दै. संध्या)**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री मार्तंड देवसंस्थानने सामाजिक बांधिलकी जपत एक आगळा आदर्श निर्माण केला आहे. देवसंस्थानच्या वतीने पुरंदर पब्लिक स्कूल, जेजुरी येथील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे आणि शालेय शुल्कासाठी धनादेशाचे वाटप करण्यात आले.

हा सेवाभावी कार्यक्रम देवसंस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि पालकांच्या मनात समाधान दिसून येत होते. देवस्थान म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे, तर समाजसेवेचे मोठे केंद्र आहे, हेच या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे प्राचार्य चंद्रशेखर भाविक यांनी विश्वस्त मंगेश घोणे यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान केला. यावेळी बोलताना प्राचार्य भाविक म्हणाले, श्री मार्तंड देवसंस्थान जे समाजोपयोगी कार्य करते, ती खरी राष्ट्रसेवाच आहे. आज गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे म्हणजे उद्याच्या सक्षम भारताची पायाभरणी करणे आहे. देशसेवेसाठी घडणारी हीच तरुण पिढी आहे आणि तिचे मनोबल वाढवण्यासाठी देवसंस्थानचे मंडळ जे कार्य करत आहे, ते अत्यंत कौतुकास्पद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच 'सेवा हीच संघटना' आणि 'शिक्षण हेच खरे सामर्थ्य' हा संदेश दिला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा साजरा होत असताना जेजुरीच्या मार्तंड देवसंस्थानने शिक्षणाला हातभार लावत या संदेशाचे खऱ्या अर्थाने पालन केले आहे.गेल्या काही वर्षांपासून देवसंस्थान केवळ यात्रेकरूंच्या सोयीसुविधांपुरते मर्यादित न राहता आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत, गरीब गरजूंना अन्नदान अशा अनेक सामाजिक कार्यात सक्रिय झाले आहे. त्याच एक भाग म्हणून हा कार्यक्रम घेण्यात आला.

# विसर्जन मिरवणुकीसाठी ढोल-ताशा पथकांसाठी नियमावली

■ **पुणे (दै. संध्या)**

गणेशोत्सवातील विसर्जन मिरवणुकीत शिस्त, सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य देत ढोल ताशा फेडरेशन राज्यव्यापी महासंघ, महाराष्ट्राच्या पुणे शहर कार्यकारिणीने पथकांसाठी नियमावली जाहीर केली आहे. मिरवणुकीत टोल वादन न करण्यासह प्रत्येक वादकाकडे ओळखपत्र, ५० ढोल व १६ ताशांसह १५० ते २०० वादकांचा सहभाग आणि चार रांगांमध्ये ढोलवादन करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. कुमठेकर व टिळक रस्त्यावर पथकांना मार्ग उपलब्ध करून देणे, लक्ष्मी रस्त्यावरील वाहतूक व्यवस्थेसाठी आवश्यक बंदोबस्त, तसेच गुलाल-भंडारा, वायूयुक्त सिलेंडर आणि इलेक्ट्रिक आतषबाजी (कोल्ड फायर) यावर निर्बंध घालण्याची मागणी महासंघाने केली आहे. डेकोरेशनच्या रथांना मनाई करण्याची सूचनाही करण्यात आली आहे. याबाबत महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर यांनी पोलीस उपायुक्त, परिमंडळ एक यांना निवेदन दिले आहे.

नियमावलीनुसार प्रत्येक वादकाकडे संबंधित पथकाचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. विसर्जन मिरवणुकीत ५० ढोल,१६ ताशे, ध्वज आणि झांज यांचा समावेश राहणार असून, १५० ते २०० वादक सहभागी होतील. ढोलवादन चार रांगांमध्ये करण्यात येणार असून, टोल वादन केले जाणार नाही.

लक्ष्मी रस्ता ओलांडण्यासाठी कुंटे चौक तसेच गुरूजी तालीम मंडळ येथील मार्गाचा वापर करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर येथून समाधान चौकाकडे पथकांना प्रवेश दिला जाणार नाही. मिरवणुकीदरम्यान ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि महिलांना गर्दीतून मार्गस्थ होण्यासाठी पथकांनी सहकार्य करावे, असेही नियमावलीत नमूद करण्यात आले आहे.

मिरवणुकीत पथकांनी पोलीस प्रशासन आणि पत्रकारांना सहकार्य करावे, तसेच वाहतूक व्यवस्थेला अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी सूचना करण्यात आली आहे. पथकांकडून तसेच गणेश मंडळांकडून उभारण्यात येणाऱ्या अतिरिक्त डेकोरेशनच्या रथांना मनाई करावी, तसेच मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या गुलाल आणि भंडाऱ्यावर निर्बंध घालावेत, अशी मागणी महासंघा च्या पुणे शहर कार्यकारिणी ने केली आहे. गुलाल-भंडाऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वायूयुक्त सिलेंडर तसेच इलेक्ट्रिक आतषबाजी यावरही निर्बंध घालण्याची मागणी करण्यात आली आहे. लक्ष्मी रस्त्यावर येणाऱ्या मिरवणुकांसाठी योग्य वेळापत्रक आणि आवश्यक पोलीस बंदोबस्त, केळकर रस्त्यावर वाहनांच्या पार्किंगला मनाई, तसेच कुमठेकर रस्ता आणि टिळक रस्त्यावर पथकांना मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी महासंघाने केली आहे. शगुन चौक आणि विजय टॉकीज चौक येथे पथकांना मार्गस्थ होण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याची मागणीही करण्यात आली आहे. विसर्जन मिरवणुकीदरम्यान पोलीस प्रशासनाला मदत करण्यासाठी गेली अनेक वर्षे महासंघाचे अनुभवी प्रतिनिधी उपलब्ध असतात. यंदाही हे प्रतिनिधी मिरवणुकीदरम्यान पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी उपस्थित राहणार असल्याचे महासंघाच्या वतीने पुणे शहर अध्यक्ष अक्षय बलकवडे यांनी सांगितले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघासाठी २३ ऑक्टोबरला मतदान

**पिंपरी : दैनिक संध्या**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर मतदार संघ आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून अरुण लाड आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत आसगावकर या विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकांची घोषणा केल्यापासून संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे. पुणे विभागात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून त्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्ष, प्रशासकीय विभाग यांनी भारत निवडणूक आयोगाच्या वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे.

## पिंपरीतील भाजप नगरसेवकांना ‘शिस्तीचे धडे’; फडणवीस घेणार प्रशिक्षण

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्ताधारी भाजपमध्ये असलेल्या गटतटामुळे वेगवेगळे प्रकरणे समोर येत आहेत. त्यामुळे नाहक भाजपची बदनामी होत आहे. सत्ता टिकवण्याबरोबरच पक्षांतर्गत शिस्त आणि समन्वय राखण्याचे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांना पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त आणि महापालिकेच्या कारभाराचे धडे देण्यासाठी भाजपकडून पाच आणि सहा ऑक्टोबरला निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वत: उपस्थित राहून नगरसेवकांना धडे देणार असून, पक्ष शिस्तीबाबत संवाद साधणार आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपने 84 जागांसह सत्ता दुसऱ्यांदा ताब्यात घेतली आहे. एवढे मोठे संख्याबळ मिळाल्यानंतर नगरसेवकांची वाढलेली राजकीय महत्त्वाकांक्षा, स्थानिक नेत्यांमधील मतभेद आणि गटतटांचे राजकारण यामुळे पक्षांतर्गत व्यवस्थापनाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा बनला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगरसेवकांचे प्रशिक्षण भाईंदर, मुंबई येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. पक्षाच्या पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानअंतर्गत राज्यतील विविध महापालिकांतील भाजप नगरसेवकांसाठी प्रशिक्षण शिबिरे सुरू आहेत. या प्रशिक्षणास मुख्यमंत्री फडणवीस हे उपस्थित राहणार आहेत. ते नगरसेवकांना शिस्तीचे तसेच, महापालिका कामकाजाचे धडे देणार आहेत. महापालिकेतील पदे, समित्या आणि विविध विषयांवरून नगरसेवकांमध्ये स्पर्धा वाढली आहे. पक्षसंघटनेशी बांधिलकी, सामूहिक निर्णय आणि प्रशासनाची समन्वय यावर प्रशिक्षणात मार्गदर्शन केले जाणार आहे. भाजप पक्षाची शहराची कोअर कमिटी आहे. या कमिटीकडून पिंपरी-चिंचवड शहर आणि महापालिकेसंदर्भातील महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे, कोणते धोरण सुरू ठेवायचे, त्याबाबत कमिटीकडून महापालिका पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातात. त्याप्रमाणे पदाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते. मात्र, पदाधिकाऱ्यांमध्ये एकवाक्यता नसल्याने एका विषयांवर वेगवेगळी मत प्रदर्शन पदाधिकाऱ्यांकडून केले जात असल्याने पक्षशिस्तीचे वाभाडे निघत आहेत. त्यावरुन कोअर कमिटीने पदाधिकाऱ्यांना शिस्तीचे डोस दिले आहेत. या निवासी प्रशिक्षणानंतर नगरसेवकांच्या कामकाजात सुधारणा होण्याची शक्यता आहे.

## लोणावळ्यात गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पोलिस सज्ज

**लोणावळा : दैनिक संध्या**

शहरातील गणेशमूर्ती विसर्जन मिरवणूक देदीप्यमान आणि कायदा व सुव्यवस्था राखणारी व्हावी, याकरिता लोणावळा शहर पोलिस सज्ज झाले आहेत. विसर्जन मिरवणुकीसाठी पोलिसांकडून तगडा बंदोबस्त नियुक्त करण्यात येणार आहे. विसर्जन मिरवणूक वेळेत व्हावी, यासाठी मंडळांना प्रत्येक चौकात येण्याचे वेळापत्रक देखील देण्यात आले आहे. प्रत्येक मंडळाने या वेळेचे पालन करावे व शिस्तबद्ध पद्धतीने पारंपरिक वाद्यामध्ये मिरवणूक काढावी, असे आवाहन लोणावळा शहर पोलिसांनी केले आहे. यंदाच्या मिरवणुकीत डीजे, लेझर, प्लाझ्मा यांना बंदी असणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गवळीवाडा या मंडळाची वैयक्तिक बैठक घेत त्यांना यंदा गुलाल न उधळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोणावळा शहरात गणेशोत्सवाची शंभर वर्षांची मोठी परंपरा आहे. ही परंपरा कायम राखत समन्वयातून विसर्जन मिरवणूक पार पडावी, याकरिता पोलिस प्रशासनाकडून सर्व मंडळांच्या तीनवेळा समन्वय बैठका घेण्यात आल्या. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी लोणावळा शहरात रूट मार्च करण्यात आला. एखादी चुकीची घटना घडल्यास ती हाताळण्यासाठी मॉकड्रिल घेण्यात आले तसेच राउंड फायर देखील करण्यात आले आहे. 25 सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थीच्या दिवशी लोणावळ्यात मानाच्या गणपती बाप्पांचे विसर्जन होणार आहे. यामध्ये 21 गणेशोत्सव मंडळे पारंपरिक पद्धतीने नंबरप्रमाणे रांगेत येणार आहेत. मानाच्या पहिल्या गणपतीचे यंदाचे शंभरावे वर्ष आहे. त्यांना सायंकाळी 4.30 वाजता मावळा पुतळा चौकात येण्याची वेळ ठरवून देण्यात आली आहे. यंदा बंदोबस्त मिरवणुकीसाठी 6 पोलिस अधिकारी व तब्बल 85 पोलिस कर्मचारी, असा मोठा बंदोबस्त असणार आहे. प्रत्येक मंडळासोबत पोलिस तैनात असणार आहेत. मिरवणुकीदरम्यान दोन मंडळांमध्ये अंतर राहणार नाही, याची दक्षता घेतली जाणार आहे. जयचंद चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी अनेक स्वागत कक्ष असले तरी त्या ठिकाणी प्रत्येक एक मध्यवर्ती ठिकाणी ढोल-ताशा पथकाने खेळ घेण्यात यावेत, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. राजकीय पक्षांनी वेगवेगळे स्वागत कक्ष न उभारता एकच मोठा स्वागत कक्ष तयार करावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक सचिन पाटील यांनी केले आहे. विसर्जन मिरवणुकीत ट्रॉली व डेकोरेशनला अडथळा होऊ नये, याकरिता विसर्जन मार्गावरील सर्व स्वागत कमानी काढून घेण्याबाबत मंडळांना सांगण्यात आले आहे. सर्व मंडळांनी आणि भक्तांनी विसर्जन मिरवणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस निरीक्षक सचिन पाटील यांनी केले आहे. लोणावळा नगरपरिषदेच्या वतीने विसर्जन घाटावर लाइटव्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, अतिरिक्त कर्मचारी नियुक्त केले आहेत. नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी मिरवणुकीदरम्यान उपस्थित असणार आहेत.

# पिंपरीगावात गिरनारची भव्य ५१ फुटी प्रतिकृती



**■ पिंपरी : (दै. संध्या)**

पिंपरीगाव येथील सुवर्ण गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवात गुजरातमधील पवित्र गिरनार पर्वताची हुबेहूब ५१ फुटी भव्य प्रतिकृती साकारून भाविकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मंडळाच्या ५१ व्या वर्षात पदार्पणानिमित्त उभारण्यात आलेला हा भव्य देखावा सध्या शहरातील गणेशभक्तांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

पुण्यातील गणेशोत्सवाप्रमाणेच पिंपरी-चिंचवडच्या गणेशोत्सवालाही एक वेगळी ओळख आणि भव्यता प्राप्त व्हावी, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम हाती घेतला. गिरनार पर्वताची प्रतिकृती अत्यंत बारकाईने आणि वास्तवदर्शी पद्धतीने साकारण्यात आल्याने भाविकांना प्रत्यक्ष गिरनार पर्वताचे दर्शन घेत असल्याचा अनुभव मिळत आहे.

विशेष म्हणजे, विविध कारणांमुळे गुजरातमधील गिरनार पर्वतावर जाऊन भगवान दत्तात्रयांचे दर्शन घेणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी हा देखावा एक आध्यात्मिक पर्वणी ठरत आहे. पिंपरीमध्येच गिरनार पर्वताची भव्यता अनुभवण्याची संधी मिळाल्याने नागरिक मोठ्या संख्येने येथे भेट देत आहेत. सुवर्णमहोत्सवी वाटचालीनंतरच्या ५१ व्या वर्षात साकारलेल्या या अनोख्या संकल्पनेचे शहरभरातून कौतुक होत असून, भाविकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दिवसरात्र सुरू असलेल्या भाविकांच्या गर्दीमुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## YCM रुग्णालयात ढोल-ताशांचा गजर, व्हिडिओ व्हायरल

### नागरिकांकडून चौकशी व कारवाईची मागणी

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील यशवंतराव चव्हाण स्मृती (YCM) रुग्णालयाच्या आवारात ढोल-ताशांचा मोठा आवाज होत असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांना शांत आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे अपेक्षित असताना रुग्णालय परिसरातच अशा प्रकारचा गोंगाट झाल्याने अनेकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

ॲड. अशोक भगवान धायगुडे यांनी संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर उपरोधिक टीका केली आहे. रुग्णालयात आजारी, वृद्ध तसेच गंभीर स्वरूपाच्या रुग्णांवर उपचार सुरू असतात. अशा परिस्थितीत रुग्णांच्या विश्रांतीसाठी शांत वातावरण आवश्यक असताना मोठ्या आवाजात ढोल-ताशे वाजवण्यास परवानगी कशी देण्यात आली, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकारामुळे रुग्णांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात येत असून संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. संबंधित कार्यक्रमासाठी पूर्वपरवानगी घेण्यात आली होती का, ध्वनीप्रदूषणासंदर्भातील नियमांचे पालन झाले होते का, तसेच रुग्णालय प्रशासनाची भूमिका काय होती,

याबाबत स्पष्टता देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वस्तुस्थिती समोर आणावी आणि नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करावी.

## भीमशक्तीनगर SRA प्रकल्पाचे फेरसर्वेक्षण करा



**■ पिंपरी (दै. संध्या)**

मोरेवस्ती, चिखली येथील भीमशक्तीनगर झोपडपट्टी पुनर्वसन (SRA) प्रकल्पातील कथित गैरप्रकारांची चौकशी करून संपूर्ण प्रकल्पाचे बायोमेट्रिक फेरसर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मारुती गणपत जाधव यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

याबाबत 21 सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात जाधव यांनी भीमशक्तीनगर SRA प्रकल्पातील प्राथमिक पात्रता-अपात्रता यादी, संमतीपत्रे आणि सर्वेक्षण प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले आहे.

मारूती जाधव यांच्या म्हणण्यानुसार, प्राथमिक सर्वेक्षणानंतर जाहीर करण्यात आलेल्या पात्रता-अपात्रता यादीत अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या काही झोपडीधारकांना अपात्र ठरविण्यात आल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. त्याचबरोबर प्रत्यक्ष स्थानिक रहिवासी नसलेल्या व्यक्तींची किंवा त्यांच्या नातेवाईकांची नावे यादीत समाविष्ट झाल्याचे आरोपही होत असल्याने संपूर्ण यादीची प्रत्यक्ष पडताळणी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. SRA प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या संमतीपत्रांच्या प्रक्रियेबाबतही नागरिकांकडून आक्षेप घेतले जात असल्याचे जाधव यांनी सांगितले. काही नागरिकांवर दबाव टाकून किंवा आर्थिक आमिष दाखवून संमतीपत्रे घेतल्याचे आरोप होत असल्याने संबंधित कागदपत्रांची सखोल चौकशी व्हावी.

## YCM रुग्णालयात ११ महिन्यांच्या बालिकेचा उपचारादरम्यान मृत्यू

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील PICU विभागात उपचार घेत असलेल्या ११ महिन्यांच्या बालिकेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर या प्रकरणातील संपूर्ण वैद्यकीय कागदपत्रे आणि सविस्तर वैद्यकीय अहवाल उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. माजी विरोधी पक्षनेते तथा माजी नगरसेवक विनोद नढे यांनी महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे याबाबत लेखी निवेदन दिले आहे.

कु. पर्णवी सचिन रजत या बालिकेवर वाय.सी.एम. रुग्णालयातील लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात (PICU) उपचार सुरू होते. २२ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.०५ वाजता उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. रुग्णालयाच्या Medical Certificate of Cause of Death नुसार मृत्यूचे तात्काळ कारण “Pulmonary Hemorrhage due to MODS with DIC with Fluid-Refractory Shock and ? Viral Encephalopathy” असे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर बालिकेवर नेमके कोणते उपचार करण्यात आले, उपचारांची प्रक्रिया काय होती आणि उपचारादरम्यान कोणत्या वैद्यकीय तपासण्या व औषधोपचार करण्यात आले, याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी संपूर्ण वैद्यकीय अभिलेखे उपलब्ध करून देण्याची मागणी नढे यांनी केली आहे. यामध्ये Emergency/Casualty Admission Notes, PICU मधील दैनंदिन उपचार नोंदी, डॉक्टरांच्या प्रोग्रेस नोट्स, नर्सिंग चार्ट्स, सर्व पॅथॉलॉजी व मायक्रोबायोलॉजी तपासण्यांचे अहवाल, Blood/CSF व Viral Markers अहवाल, देण्यात आलेली जीवनरक्षक औषधे, IV Fluids व Blood Products यांच्या नोंदी, वरिष्ठ बालरोगतज्ज्ञांचा Case Summary, Complete Indoor Case Sheet/IPD File तसेच Death Summary यांच्या प्रमाणित प्रती देण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित सर्व अधिकृत वैद्यकीय अभिलेखे नातेवाईकांना आणि संबंधितांना विनाविलंब उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालय प्रशासनाला योग्य ते आदेश द्यावेत.

## सामाजिक बांधिलकी जपत सचिन काळभोर यांचा अनोखा उपक्रम

**■ पिंपरी (दै. संध्या)**

भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांच्या वाढदिवसानिमित्त निगडी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिर परिसरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या-पुस्तकांचे वाटप करण्यात आले, तसेच सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

सामाजिक उत्तरदायित्व जपत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वाढदिवस साजरा करण्याबरोबरच समाजोपयोगी कार्य करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

सचिन काळभोर यांना वाढदिवसानिमित्त अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अमित गोरखे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, अनुप संजय धोत्रे, आदी मान्यवरांनी लेखी शुभेच्छापत्र पाठवून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच महापौर रवी लांडगे आणि निगडी परिसरातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देत सचिन काळभोर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यामध्ये शिवकुमार बायस, राहुल येवले, सुधीर भोसले, पप्पू हतागळे, विकास कांबळे, जयदेव भुवड, सचिन शिंदे, अनिकेत काळभोर, अफसर मुलाणी, राहुल सोनवणे, गणेश बाफना, रवी खैरनार, विशाल उबाळे, प्रवीण पायाळ, प्रसाद फिरोदिया, राजू शेख, रफीक शेख, जावेद शेख, महेबुब शेख, रोहिदास शिवणेकर, संजय बोराडे यांचा समावेश होता.



## थोडक्यात पण महत्वाचे



### भक्तिमध्ये समाज जोडण्याची ताकद!

**ओझर : दैनिक संध्या**

भक्तिमध्ये समाज जोडण्याची ताकद असते. असा आधुनिक समाज विश्वात स्वतःचे स्थान निर्माण करेल." असे उदगार ह. भ. प. प्रज्ञाताई पंडित यांनी काढले. गणेशोत्सवानिमित्त जुन्नर येथील ओझर येथे गणेश पुराणातील स्तोत्रांवर निरूपणाचा विशेष धार्मिक उपक्रम रविवारी संपन्न झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. गणेशोत्सवाच्या काळात विविध तीर्थक्षेत्रांमध्ये भजन, कीर्तन, प्रवचन आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र, गणेश पुराणातील स्तोत्रांवर विशेष निरूपण आयोजित करण्याचा उपक्रम ओझर देवस्थानाच्या वतीने प्रथमच करण्यात आला. दैनंदिन उपासनेत म्हटल्या जाणाऱ्या विविध स्तोत्रांचा भावार्थ सर्वसामान्य भाविकांपर्यंत पोहोचावा, स्तोत्रांचा अर्थ समजून घेता यावा आणि त्याविषयी जनमानसात अधिक गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने ओझर देवस्थानाने या उपक्रमाचे आयोजन केले होते. या निमित्ताने ह. भ. प. प्रज्ञाताई पंडित यांनी गणेश पुराणातील स्तोत्रांचे निरूपण करताना त्यांचा अर्थ, भावार्थ तसेच उपासनेतील महत्त्व विशद केले. ह. भ. प. प्रज्ञाताई पंडित विविध धार्मिक आणि आध्यात्मिक उपक्रमांमध्ये सातत्याने कार्यरत असून, गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध देवस्थानांमध्ये विविध स्तोत्रांवर निरूपण करीत आहेत. तसेच ऑनलाइन माध्यमातून स्तोत्रांचे अध्ययन आणि मार्गदर्शन करण्याचे कार्यही त्या सातत्याने करीत आहेत. देश-विदेशातील हजारो साधक त्यांच्याकडून स्तोत्रांचे अध्ययन करीत आहेत. स्तोत्र केवळ पठणापुरते मर्यादित न राहता त्यातील अर्थ, भाव आणि उपासनेमागील भूमिका समजून घेऊन ते आचरणात यावे, या उद्देशाने त्यांचे कार्य सुरू आहे. या कार्यक्रमास ओझरच्या सरपंच राजश्री कवडे आणि पोलीस पाटील प्रिती कवडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, संयोजन व समन्वय ओझर देवस्थानाचे उपाध्यक्ष श्री. तुषार कवडे यांनी केले. गणेश पुराणातील स्तोत्रांवर निरूपणाचा हा आगळा धार्मिक उपक्रम आयोजित केल्याबद्दल ग्रामस्थांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

### पोलीस अंमलदारांच्या वेतनातील तफावत दूर करण्याची मागणी

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

सातव्या वेतन आयोगानुसार पोलीस अंमलदार व लिपिक कर्मचाऱ्यांच्या वेतनस्तरातील तफावत दूर करावी, अशी मागणी शिखर संस्थेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलीस महासंचालक व वित्त सचिवांकडे केली आहे. संस्थेचे अध्यक्ष संपतराव जाधव व पुणे शहर उपाध्यक्ष रविंद्र कामठे यांनी याबाबत निवेदन दिले. पोलीस अंमलदारांना १० वर्षांनंतर S-10, २० वर्षांनंतर S-12 आणि ३० वर्षांनंतर S-16 वेतनस्तर लागू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. पोलीस अंमलदारांना दीर्घ ड्युटी, दंगल, सण-उत्सवातील बंदोबस्त तसेच जोखमीच्या परिस्थितीत काम करावे लागते. मात्र, त्यांच्या वेतनात अपेक्षित वाढ होत नसल्याने आर्थिक नुकसान होत असल्याचा दावा संस्थेने केला आहे. शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास हिवाळी अधिवेशनात दहा हजारांहून अधिक पोलीस अंमलदारांच्या सहभागाने शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशारा अध्यक्ष संपतराव जाधव यांनी दिला आहे.



### आदर्शांच्या पावलावर पाऊल ठेवून ध्येय गाठा : प्रा. डॉ. जाधव

**नाझरे सुपे पुरंदर : दैनिक संध्या**

ध्येय गाठायचे असेल तर डोळ्यासमोर आदर्श ठेवा. आपल्या आजूबाजूच्या कर्तबगार लोकांचे जीवन जवळून अभ्यासा. त्यांच्या विचारातून प्रेरणा घ्या. म्हणजे यशाचा रस्ता सोपा होतो. जीवनात आई-वडील आणि शिक्षकांचा मान राखा, असा सल्ला शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव प्रा. डॉ. एम. एच. एस. जाधव यांनी दिला. वाल्हे येथील महर्षी वाल्मिकी विद्यालयात शनिवारी करियर मार्गदर्शन कार्यक्रम झाला. आदर्श सामाजिक प्रतिष्ठान, नवदिशा प्रतिष्ठान, पालक-शिक्षक संघ आणि विद्यालय यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम घेतला. ऑस्ट्रेलियातील अतिदक्षता विभागाचे तज्ज्ञ डॉ. निलेश शहा यांच्या कल्पनेतून 'मी कसा घडलो' ही व्याख्यानमाला झाली. यावेळी प्रा. जाधव म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्व बाजूंनी वाढीसाठी शिकवण्याच्या पद्धतीत बदल हवा. शिक्षकांनी विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेवून शिकवावे. त्याच्यातील गुणांना वाव द्यावा. फक्त पुस्तकातील ज्ञान नको, तर व्यक्तिमत्व घडवणारे शिक्षण हवे. यश मिळाल्यावर आई-वडील आणि शिक्षकांचे कष्ट विसरू नका. त्यांनी विद्यार्थ्यांना पाच कानमंत्र दिले - खरे तेच बोला आणि वागा, बुद्धी आणि नीतीचे मूल्ये जपा, आईला आणि देशाला देव माना, वाईट कृत्य न करताही चांगले जीवन जगता येते, आणि इतरांना तुमच्याकडे पाहून जगावेसे वाटेल असे जगा. प्रत्येकाला वंदे मातरम आणि राष्ट्रगीत आले पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सरपंच दत्तात्रय पवार होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे म्हणाल्या, आज आपण समाज माध्यमांवर यशस्वी लोकांचे चमकदार जीवन पाहतो. पण त्यामागचा संघर्ष आपल्याला दिसत नाही. तो संघर्ष समजून घेण्यासाठी 'मी कसा घडलो' सारखे कार्यक्रम खूप गरजेचे आहेत. हे कार्यक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. याचवेळी राष्ट्रीय विषाणू आणि एड्स संशोधन संस्थेतर्फे क्षयरोग संशोधनासाठी मदत करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि आशा सेविकांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी सरपंच अतुल गायकवाड, सचिन लंबाते, प्रमोद शहा, माजी कृषी अधिकारी सिद्राम भुजबळ, मुख्याध्यापक भारत वाघोले, माजी मुख्याध्यापक अनिल कुंभार, उपसरपंच सागर भुजबळ, दादासाहेब मदने उपस्थित होते. प्रस्तावना रावसाहेब चव्हाण यांनी केली. सूत्रसंचालन शैला गवारी व अर्चना सासवडे यांनी केले तर आभार सुदाम गायकवाड यांनी मानले.



# मुसळधार पावसाने सोयाबीन पिकांना दिलासा

**■ नारायणगाव(दै. संध्या)**

गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने जुन्नर तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार हजेरी लावल्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. या दमदार पावसामुळे तालुक्यातील खरीप हंगामातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीनला मोठे जीवदान मिळाले असून, सुकण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना एक प्रकारे नवसंजीवनीच मिळाली आहे.

यावर्षी जुन्नर तालुक्यात खरीप हंगामात सोयाबीनची मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात पावसाने चांगली साथ दिल्यानंतर अचानक पावसाने प्रदीर्घ ओढ दिली. त्यामुळे जमिनीतील ओलावा संपून अनेक ठिकाणी सोयाबीनची वाढ पूर्णपणे खुंटली होती. काही भागांत तर पिके सुकल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला होता आणि त्यांच्या उत्पादनावर संकट ओढवले होते. मात्र, सतत दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे जमिनीला पुरेसा ओलावा मिळाला असून सोयाबीनच्या पिकांना मोठा आधार मिळाला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवीत झाल्या आहेत.

ओतूर येथील प्रगतशील शेतकरी राजेंद्र भोर यांनी सांगितले की, "गेल्या काही दिवसांपासून पाऊसाने दडी मारल्याने सोयाबीनची वाढ थांबली होती. परंतु, आता झालेल्या दोन दिवसांच्या सलग पावसामुळे पिकाला ऐन गरजेच्या वेळी पाणी मिळाले आहे. अशीच पावसाची साथ पुढेही राहिल्यास यंदा नक्कीच चांगले उत्पादन घेता येईल.

"तर आळेफाटा येथील शेतकरी जयवंतराव डुंबरे यांनी प्रतिक्रिया दिली की, "हा पाऊस सोयाबीनसाठी अत्यंत फायदेशीर ठरला आहे. मात्र, पिकांची काढणी होईपर्यंत पुढील काळातही योग्य प्रमाणात पाऊस पडणे गरजेचे आहे. तसेच, बदलत्या वातावरणामुळे कृषी विभागाने शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे."

या मुसळधार पावसामुळे केवळ सोयाबीनलाच नव्हे, तर बाजरी, मका, भुईमूग आणि भाजीपाल्याच्या पिकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. विहिरी आणि पाण्याच्या स्त्रोतांच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेती सिंचनाचा प्रश्न काही अंशी हलका झाला आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचून राहिल्यास किंवा हवेत अतिप्रमाणात आर्द्रता निर्माण झाल्यास पिकांवर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे कृषी विभागाने शेतकऱ्यांना आपल्या पिकांची नियमित पाहणी करण्याचा सल्ला दिला आहे. सोयाबीनच्या पानांची, खोडांची आणि शेंगांची स्थिती तपासून गरजेनुसार कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार योग्य त्या कीटकनाशकांची फवारणी व उपाययोजना कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.



## नारायणगावात ज्ञानदानातून राष्ट्रनिर्मिती करणाऱ्या शिक्षकांचा गौरव

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या तसेच ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष योगदान देणाऱ्या शिक्षकांचा शरयू टोयोटा T-Sparsh,पुणे–नाशिक हायवे बायपास,नारायणगाव ता.जुन्नर यांच्या वतीने 'नेशन बिल्डर अवॉर्ड्स २०२६' अंतर्गत विशेष सन्मान करण्यात आला.

शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मार्गदर्शन, नवोदय विद्यालय व सैनिक स्कूल प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची तयारी, गुणवत्तापूर्ण अध्यापन, शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा,वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन तसेच इस्रो–नासा यांसारख्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे,असे शिक्षण क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. हा पुरस्कार शिवनेरभूषण तथा माजी सैनिक रमेश खरमाळे, व्ही.पी.श्री.हेमंत एम्प्लावार, आनंद आंधळे, ऋतुराज पटवर्धन व बाळासाहेब गिलबिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी शरयू टोयोटाचे व्हिपी हेमंत एम्प्लावार यांनी टोयोटाचे सामाजिक योगदान विशद करून उपस्थित शिक्षकांना भरभरून शुभेच्छा दिल्या व ट्रेनर ऋषिराज यांनी राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षकाची भूमिका विशद केली तर सन्मानार्थी शिक्षक बाळासाहेब कानडे यांनी मनोगत व्यक्त केले . यावेळी प्रमुख पाहुणे रमेश खरमाळे यांनी शिक्षणासोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी अधोरेखित केली.वाढते जागतिक तापमान आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास लक्षात घेता प्रत्येकाने पर्यावरण रक्षणासाठी योगदान देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. "आज लावलेले एक झाड म्हणजे भविष्यातील पिढीसाठी दिलेली जीवनाची शाश्वती आहे" या भावनेतून वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी केले. या सोहळ्यात निर्मला मंगेश मेहेर, श्रीकृष्ण डुकरे, नितीन शेजवळ, दत्तात्रय आहिरे, अशोक मावळे या १८ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

## राज्यातील शेतकऱ्यांना पुन्हा उभे करणे हेच आमचे ध्येय

**■ जेजुरी (दै. संध्या)**

अल नॅनो मुळे राज्याच्या अनेक भागात पावसाचा खंड पडला,यामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान झाले,या नुकसानामुळे शेतकरी ढासळला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना पुन्हा उभे करणे ही आमचे ध्येय आहे. राज्यशासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शासन

त्यांना सर्वोत्परी मदत करणार आहे असे राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांनी सांगितलं. महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुरंदर तालुक्याचा दौरा केला. पुरंदर तालुक्यातील नावळी, कोळविहिरे येथील शेतात जाऊन त्यांनी पिकांची माहिती घेतली. भोरवाडी येथे पत्रकारांशी बोलताना दत्तमामा भरणे यांनी. अल नॅनो मुळे राज्याच्या अनेक भागात पाऊसाचा खंड पडला. त्यामुळे खरिपाची पिके अडचणीत आली. त्या अनुषंगाने पुरंदर, बारामती दौंड तालुक्याचा पाहणी दौरा केला. शेतकऱ्यांचे उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. आता तोंडाशी आलेला घास गेला आहे. या पिकांवर शेतकऱ्यांनी अनेक स्वप्ने रंगवली होती, या स्वप्नांचा चक्काचूर झाला आहे. शेतकरी ढसाळला आहे. राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री दुष्काळा संदर्भात अधिसूचना काढणार आहेत. आम्ही शेतकऱ्यांनी मुले आहोत, त्यांचे हित कशात आहे, त्यांच्या अडचणी काय आहेत त्या नुसार त्यांना मदत करणार आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर



सोडणार नाही. राज्यशासन, पीक विमा योजना, अहिल्यादेवी होळकर कर्ज माफी योजना, तसेच विविध कृषी विभागाच्या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुन्हा उभे करणे ही आमचे ध्येय आहे. खरीप पिके गेली आता रब्बी पिकांसाठी शेतकऱ्यांना सहकार्य करणार असल्याचे दत्ता मामा भरणे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे, पुरंदर विधानसभा अध्यक्ष वामनतात्या जगताप, जिल्हा परिषदेच्या सदस्य डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, सदस्य अजय इंगळे, पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे,सदस्या स्मिता निगडे, अर्चना कटके, माजी सरपंच बापू भोर, सरपंच संदेश पवार, योगेश पवार, संदीप निगडे, अजिंक्य कड, जेजुरी देवसंस्थांचे विश्वास मंगेश घोणे, विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर, जिल्हा कृषी अधीक्षक वैभव तांबे,तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण,मंडळ कृषी अधिकारी चंद्रकांत धायगुडे आदी कार्यकर्त्ये यावेळी उपस्थित होते.

## प्रदीप वसंतराव कंद यांच्या 'कार्यसिद्धी' पुस्तकाचा दिमाखात प्रकाशन सोहळा संपन्न

**■ कोरेगावमुळ (दै. संध्या)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष प्रदीप वसंतराव कंद यांच्या माध्यमातून लोणीकंद-पेरणे जिल्हा परिषद गटात करण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी कामांचा तसेच विकासकार्याचा आढावा घेणाऱ्या 'कार्यसिद्धी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.

या पुस्तकामध्ये लोणीकंद-पेरणे जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये करण्यात आलेली विकासकामे, सामाजिक उपक्रम, नागरिकांसाठी राबविण्यात आलेले उपक्रम तसेच विविध क्षेत्रातील कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे 'कार्यसिद्धी' हे पुस्तक विकासकामांचा दस्तऐवज म्हणून महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. यावेळी शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना म्हणाले की, प्रदीप कंद यांनी लोणीकंद-पेरणे जिल्हा परिषद गटातील विकासकामांना सातत्याने प्राधान्य देत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत.

केलेल्या कामांचा लेखाजोखा 'कार्यसिद्धी'च्या माध्यमातून नागरिकांसमोर मांडणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. विकासकामांची ही वाटचाल भविष्यातही अशीच सुरु राहावी, यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे



आयोजक प्रदीप वसंतराव कंद यांनी प्रास्ताविकातून 'कार्यसिद्धी' पुस्तकामागील भूमिका आणि लोणीकंद-पेरणे जिल्हा परिषद गटात करण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती उपस्थितांसमोर मांडली. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा सातत्याने प्रयत्न केला असून, या कार्याचा दस्तऐवज म्हणून 'कार्यसिद्धी' पुस्तक प्रकाशित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर, हवेली तालुका अध्यक्ष दिलीप वाल्हेकर, हवेली पंचायत समिती सभापती युवराज काकडे, माजी सरपंच पंढरीनाथ कटके, कुबेर पतसंस्थेचे संस्थापक रमेश हरगुडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी संदेश आव्हाळे, हवेली तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष जय कंद, माजी तालुकाध्यक्ष महिला लोचन शिवले, माजी सरपंच योगेश शितोळे, साईनाथ वाळके, सागर तळेकर यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, तंटामुक्तीचे अध्यक्ष, आजी माजी पदाधिकारी,विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



## कवठे येमाईत ६१ किलो ३०० ग्रॅम गांजा जप्त; ४० लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**कवठे यमाई : दैनिक संध्या**


शिरूर-मंचर रस्त्यावरील इचकेवस्ती परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ६१ किलो ३०० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत गांजासह मोटार,मोबाईल व इतर साहित्य असा एकूण सुमारे ४० लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.बुधवारी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास पोलीस हवालदार तुषार पंधारे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलिसांनी कवठे येमाई येथील इचकेवाडी परिसरात सापळा रचला. संशयिताच्या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. या प्रकरणी पोपट विठ्ठल शितोळे (वय ५२, रा. इचकेवाडी, कवठे येमाई, ता. शिरूर, जि. पुणे) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत सुमारे ३० लाख ६१ हजार रुपये असल्याची माहिती आहे. शिरूर पोलिसांनी शितोळे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, हा गांजा कुठून आणण्यात आला, कोणाला देण्यात येणार होता आणि या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. या कारवाईमुळे कवठे यमाई परिसरातील अमली पदार्थांच्या व्यवहारावर पोलिसांनी मोठा प्रहार केल्याचे दिसून येत आहे.

## पुणे शिक्षक मतदारसंघातुन अजित गावडे इच्छूक

**कवठे यमाई: दैनिक संध्या**



महाराष्ट्रातील विधान परिषद पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीची निवडणूक आयोगाने घोषणा केली आहे. येत्या २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान, तर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. औरंगाबाद, पुणे, नागपूर आणि अमरावती विभागातील एकूण पाच जागांसाठी ही निवडणूक होत असून, त्यामध्ये तीन पदवीधर तर दोन शिक्षक मतदारसंघांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी इच्छुक उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे. शिरूर तालुक्यातील माजी आमदार पोपट गावडे यांचे नातू तथा ग्रामीण विकास शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अजित सोनभाऊ गावडे हे पुणे विभागातून शिक्षक मतदारसंघाची निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याचे शिरूर तालुका शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष नागेश केदारी यांनी सांगितले. अजित गावडे यांनी या निवडणुकीच्या दृष्टीने तयारी सुरू केली असून पुणे विभागातील विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षक मतदारांशी संपर्क साधण्याचा सपाटा लावला आहे. अजित गावडे यांना मोठी राजकीय पार्श्वभूमी असून, गावडे कुटुंब गेल्या ६० वर्षांहून अधिक काळ राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. सर्वपक्षीय सलोखा, उच्चपदस्थ राजकीय नेत्यांशी असलेले घनिष्ठ संबंध तसेच शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षकांच्या अडीअडचणींची जाण आणि प्रशासकीय बाबींचा अनुभव यामुळे त्यांचा जनसंपर्क वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत गावडे घराण्यातील अजित गावडे यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे.



## कवठे यमाई ग्रामपंचायती त 'प्रशासक राज'

**कवठे यमाई : दैनिक संध्या**

शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या असलेल्या कवठे यमाई ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून शिरूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बी. आर. गावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गावडे यांनी गुरुवारी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून प्रशासकपदाचा पदभार स्वीकारला आणि तातडीने कामकाजाला सुरुवात केली. पदभार स्वीकारल्यानंतर गावडे यांनी ग्रामपंचायतीअंतर्गत प्रलंबित असलेली विकासकामे, नागरिकांच्या समस्या तसेच विविध कामांमधील अडचणींची माहिती घेतली. प्रलंबित कामांना प्राधान्य देऊन ती त्वरेने व प्रभावीपणे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,असे गावडे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून गावातील विविध समस्या जाणून घेतल्या. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर आवश्यक त्या उपाययोजना अग्रक्रमाने सोडविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. दरम्यान, आरोग्य विभागाकडून ग्रामपंचायतीला डेंग्यू व मलेरिया प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत प्राप्त झालेल्या पत्राची दखल घेत गावात तातडीने डास प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याच्या सूचना गावडे यांनी दिल्या. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारी व विकासकामांकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य प्रकारे कामकाज करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.यावेळी माजी सरपंच मनीषा पांडुरंग भोर,उपसरपंच राजेंद्र इचके,विठ्ठलराव मुंजाळ,रामभाऊ इचके,सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब घोडे,ग्रामविकास अधिकारी पूनम थोरात-चितळकर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. अनुभवी अधिकारी म्हणून शिरूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बी. आर. गावडे यांची प्रशासक म्हणून नियुक्ती झाल्याने ग्रामपंचायतीतील प्रलंबित विकासकामांना गती मिळेल आणि नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे सोडविल्या जातील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# आवटे विद्यामंदिर जुन्नर येथे कायदेविषयक शिबिर संपन्न

■ जुन्नर : (दै. संध्या)



मा श्री एस बी शेलार जिल्हा न्यायाधीश -१ तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली आण्णासाहेब आवटे विद्यामंदिर जुन्नर येथे सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत मा श्रीमती स्मिता राजहंस उपवनसंरक्षक अधिकारी जुन्नर व शिरुर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाले महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेच्या कॉमन मिनिमम प्रोग्रामनुसार कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते

शिबीरात जुन्नर तालुका वकील बार असोसिएशन चे उपाध्यक्ष अॅड निलीमा शेरकर अॅड राजीव गोसावी अॅड रणजित भगत अॅड आशिषकुमार वानखेडे श्रीमती मयुरी खोसे निर्भया व दामिणी पथक महिला पोलीस जुन्नर तालुका विधी सेवा समिती समन्वयक श्री प्रशांत मोरतळे तसेच शिवाजी मराठा शिक्षण संस्था शिवनेर संस्थेचे सहसेक्रेटरी श्री निलेश गुजाळ संचालक रवींद्र पानसरे आण्णासाहेब आवटे विद्यामंदिर मुख्याध्यापिका श्रीमती संगीता बारवे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री मिननाथ पानसरे श्री संदीप दातीर श्री सुरेश लांडे श्रीमती प्रियंका वर्पे श्रिमती सुनिता निलख श्रीमती आरती गायकवाड श्री शौकत पठाण तसेच आण्णासाहेब आवटे विद्यामंदिराचे शिक्षक विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

या कायदेविषयक शिबीराचे प्रमुख मागदर्शक श्रीमती स्मीता राजहंस यांनी कायदेविषयक शिबिराचे औचित्य साधून नालसा शिक्षा स्कीम २०२६ या विषयावर मार्गदर्शन केले तसेच पोस्को कायदा आणि घर घर मे न्याय की जागृती या विषयावर अॅड राजीव गोसावी यां विषयावर मार्गदर्शन केले तसेच नागरिकांचे मुलभुत कर्तव्य आणि आदिवासींच्या हक्कांचे संरक्षणाबाबत अंमलबजावणी या विषयावर अॅड रणजित भगत तसेच हुंडा ही सामाजिक अनिष्ठ प्रथा आणि स्त्रीपुरुष समानता घटनात्मक मुल्य या विषयावर निर्भया व दामिणी पथक महिला पोलीस श्रीमती मयुरी खोसे यांनी मार्गदर्शन केले प्रस्तावणा अॅड निलीमा शेरकर यांनी केले कार्यक्रमाविषयी मनोगत तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मिननाथ पानसरे व आभार प्रदर्शन श्री संदिप दातीर यांनी केले सदर कायदेविषयक शिबिर मोठया उत्साहात यशस्वीरित्या पार पडले

## सेवा सेतू अभियानांतर्गत महावितरणचे पुणे परिमंडलात २३ ठिकाणी किऑस्क

■ पुणे(दै. संध्या)



वीजग्राहकांना महावितरणच्या विविध सेवा अधिक वेगाने व सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात तसेच सौरऊर्जा योजनांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी महावितरणकडून 'सेवा सेतू अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पुणे परिमंडलात २३ ठिकाणी विशेष किऑस्क उभारण्यात आले असून, या किऑस्कवर सौर योजनांसह महावितरणच्या विविध सेवांची माहिती व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० याबाबत नागरिकांना किऑस्कवर माहिती देण्यात येत आहे.

योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, आर्थिक लाभ, सौर संच बसविण्याची कार्यपद्धती, अंदाजित खर्च तसेच कर्ज सुविधेबाबत मार्गदर्शन केले जात आहे. स्थानिक बँक प्रतिनिधी आणि निवडसूचीवरील सौर कंत्राटदारांच्या माध्यमातून आवश्यक माहिती व समन्वय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पुणे परिमंडलातील २३ किऑस्कमध्ये आतापर्यंत ४६४ नागरिकांनी भेट देऊन सौर योजना व महावितरणच्या विविध सेवांची माहिती घेतली आहे. यामध्ये ६ नवीन अर्ज प्राप्त झाले आहेत. पुणे शहरातील ९ किऑस्कवर २७० नागरिकांनी भेट दिली असून, पिंपरी-चिंचवड शहरातील १३ किऑस्कवर १८७ नागरिकांनी भेट दिली आहे. राजगुरुनगर येथील किऑस्कवरही ७ नागरिकांनी भेट देऊन योजनांची माहिती घेतली आहे.

## खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची उत्तरप्रदेश सहप्रभारीपदी निवड

■ पुणे(दै. संध्या)



संसदीय स्थायी समितीच्या (विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण, वने व हवामान बदल) अध्यक्षा व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांची उत्तरप्रदेश सहप्रभारीपदी निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी आगामी विधानसभा निवडणूक आणि २०२९ मध्ये होणारी लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन पक्षसंघटनेत काही महत्त्वाचे बदल केले आहेत.

भाजपने नुकतीच आपली नवीन प्रभारी आणि सहप्रभारींची यादी जाहीर केली. त्यामध्ये उत्तर प्रदेशच्या प्रभारी पदाची सूत्र विनोद तावडे यांच्याकडे, तर सहप्रभारी पदाची सूत्र प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. राज्यसभेची पहिलीच टर्म असलेल्या प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी संसदेत सक्रिय सहभाग नोंदवतात. तसेच सर्वच आघाड्यांवर उल्लेखनीय व लोक-देशहिताचे मुद्दे मांडत प्रभावी कामगिरी करतात. या कामगिरीबद्दल मेधा कुलकर्णी यांना नुकताच 'संसदरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. हा पुरस्कार त्यांना सलग दुसऱ्यांदा मिळाला आहे. भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्राच्या प्रभारीपदी बैजयंत जय पांडा यांची तर सहप्रभारीपदी अमित मालवीय, सदानंद तानावडे, कमलजीत सहरावत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आपल्यावर सोपवलेल्या नवीन जबाबदारीविषयी बोलताना डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "या निवडीबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, राष्ट्रीय महासचिव बी. एल. संतोष आणि उत्तरप्रदेश प्रभारी विनोद तावडे यांचे मनापासून आभार मानते. माझ्यावर सहप्रभारी पदाची जबाबदारी सोपवली आणि विश्वास दाखवला, हा विश्वास सार्थ करण्याचा निश्चित प्रयत्न करेन. उत्तरप्रदेशमध्ये सहा क्षेत्र असून, नक्की कोणती जबाबदारी माझ्यावर सोपवणार याबाबत मला उत्सुकता आहे. मुख्यमंत्री योगीजींच्या कार्यकाळात उत्तरप्रदेशचा विकास सुरू आहे. येणाऱ्या काळात अधिक चांगल्या पद्धतीने उत्तर प्रदेशचा विकास होईल. यामध्ये माझा सहभाग असेल याचा मला विशेष आनंद आहे." प्रा. कुलकर्णी यांनी रेल्वे, महिला सुरक्षा, आरोग्य, ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक न्याय, कॉर्पोरेट जिहादच्या संबंधित विषयांवर संसदेमध्ये सातत्याने मुद्देसूद भाष्य केले आहे. विशेष सत्रात, झिरो अवर, प्रश्नोत्तरे व विविध विषयांवरील चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

## जय भवानी मित्र मंडळ आयोजित 'होम मिनिस्टर' स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पिंपरी (दै. संध्या)



जय भवानी मित्र मंडळ दरवर्षी लहान मुले आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रम राबवित असते. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून चार आनंदाचे क्षण सर्वांना अनुभवता यावेत, यासाठी मंडळ सर्वांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत असते. त्यामुळे परिसरातील सर्व महिला व मुले गणेशोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात.

त्याचाच एक भाग म्हणून यंदा मंडळाने महिलांसाठी खास 'होम मिनिस्टर' या लोकप्रिय स्पर्धेचे आयोजन केले होते. पावसाचे वातावरण असतानाही या स्पर्धेला शेकडो महिलांनी उल्लेखनीय उपस्थिती नोंदवत उत्साहात सहभाग घेतला.

स्पर्धेचे सूत्रसंचालन संदेश पारकर आणि रोहन कांबळे यांनी आपल्या अनोख्या आणि खुमासदार शैलीने केले. स्पर्धेची सुरुवात हास्यविनोद आणि मनोरंजक प्रश्नांनी झाली. योग्य उत्तर देणाऱ्या महिलांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. महिलांनी सादर केलेल्या बहारदार उखाण्यांनी स्पर्धेत चांगलीच रंगत आणली. विविध खेळांमध्ये स्पर्धक महिलांनी उत्साहात सहभाग घेतला. जसजशी स्पर्धा पुढे जात होती, तसतशी स्पर्धकांमध्ये चुरस आणि प्रेक्षकांमध्ये उत्कंठा वाढत होती.

स्पर्धेचा निकाल: • प्रथम क्रमांक: सौ. सुष्मा जराड • द्वितीय क्रमांक: सौ. लता महंकाळे • तृतीय क्रमांक: सौ. सारिका तावरे विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण नगरसेविका मा. अर्चनाताई तापकीर आणि राष्ट्रवादी महिला उपाध्यक्ष मा. अश्विनीताई तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष संजय जराड यांच्यासह चंद्रकांत तापकीर, शशिकांत तापकीर, मनोज शिंदे, संतोष जराड, गणेश वाबळे, स्वप्निल नवथरे, राहुल तावरे, महेश तावरे, आकाश कवितके, अमृत यादव, प्रथमेश टावरे, ओम तापकीर, निखिल घाडगे, सागर वाघमारे, अक्षय जराड, आर्यन जराड, शुभम डोंगरे, सर्व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## चाकण येथे अप्पर तहसीलदार कार्यालयास मंजुरी

■ चाकण (दै. संध्या)

चाकण येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यास शासनाने अखेर मंजुरी दिली आहे. वाढता प्रशासकीय व्याप, लोकसंख्या आणि नागरिकांना सोयीस्कर सेवा पुरविण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रशासकीय कामांना गती मिळेल आणि नागरिकांना विविध सेवा अधिक सहजपणे उपलब्ध होणार आहेत.

राजगुरुनगर येथील तहसील कार्यालयावरील वाढता कामाचा ताण, अपुरा कर्मचारी वर्ग आणि तालुक्यांचे भौगोलिक अंतर लक्षात घेता चाकण सारख्या महत्त्वाच्या ठिकाणी अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याची मागणी होत होती. नागरिकांना प्रशासकीय सेवा त्यांच्या जवळ उपलब्ध व्हाव्यात, तसेच कामकाजात अधिक गतिमानता यावी या उद्देशाने या नवीन कार्यालयाच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रशासन लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या निर्णयानुसार परिशिष्ट - १३३ मध्ये नमूद केलेल्या पदांना मंजुरी देण्यात आली आहे. ही पदे संबंधित संवर्गाचाच भाग राहणार आहेत. खेड तालुक्यातील राजगुरूनगर तहसील कार्यालयावरील कामाचा बोजा कमी होणार आहे. चाकण परिसरातील नागरिकांना प्रशासकीय सेवा जवळ मिळणार असून, महसुली कामकाजात अधिक गतिमानता येण्यास मदत होणार आहे.

चाकणला नवीन अप्पर तहसील कार्यालय सुरू होणार असल्यामुळे महसूल मंडळांची पुनर्रचना करण्यात आली आहे. या विभागणीनुसार खेड तहसील कार्यालयांतर्गत राजगुरूनगर, वेताळे, कडूस, कनेरसर, पाईट, वाडा, कुडे बुद्रुक ही महसूल मंडले येतील. तर, चाकण अप्पर तहसीलदार कार्यालयांतर्गत चाकण, आळंदी, पिंपळगाव तर्फे खेड, करंजविहीरे या महसूल मंडळांचा समावेश असेल.

## एआयएसएसएमएस औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बोरीभडक येथे दिक्षांत समारंभ संपन्न

■ उरुळी कांचन (दै. संध्या)



एआयएसएसएमएस औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बोरीभडक येथे शासकीय स्तरावर घेण्यात आलेल्या अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा (ऑगस्ट २०२६) मध्ये उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा दिक्षांत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना NTC (National Trade Certificate) प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच विविध व्यवसायांमध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य राजेंद्र वाळुंज होते. उद्योजक अविनाश पवार, आशुतोष चंद, नितिन शेळके यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते गुणवंत प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रथम वर्षाच्या परीक्षेत एकूण २५१ प्रशिक्षणार्थ्यांमधून इलेक्ट्रिशियन विभागातील आदित्य विजय नाईकनवरे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तसेच CBT परीक्षेत १५० पैकी १५० गुण मिळविल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. आयटीआयचे माजी प्रशिक्षणार्थी तथा निलेश इंजिनिअरिंग वर्क्स, वडकी येथील आशुतोष चंद यांच्या हस्ते आदित्य नाईकनवरे यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

विषयानुरूप विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पवन राठोड, साहिल शेख, रूपेश राऊत, ओंकार खरात, पार्थ काशिद, ओम पवार, कुणाल मुळे, प्रशांत जाधव आणि नितिन खुपसे यांचाही सन्मान करण्यात आला. आयटीआयचे माजी प्रशिक्षणार्थी तथा स्मार्ट केअर इलेक्ट्रॉनिक्सचे प्रोप्रायटर नितिन शेळके आणि अक्षय चंद यांच्या हस्ते या प्रशिक्षणार्थ्यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देण्यात आले. द्वितीय वर्षाच्या अंतिम परीक्षेत एकूण २०७ प्रशिक्षणार्थ्यांमधून सुजल सचिन गिरमे यांनी ९६ टक्के गुणांसह इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक व्यवसायात प्रथम क्रमांक मिळविला. मयुरी मुरलीधर वाघोले यांनी ९४.५ टक्के गुणांसह वेल्डर व्यवसायात द्वितीय क्रमांक मिळविला, तर शिवान नेसू व तनुजा बाळासाहेब पिंगळे यांनी ९४ टक्के गुणांसह इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन केले. या गुणवंत प्रशिक्षणार्थ्यांचा अविनाश पवार, प्लॅंट हेड, रेडिओटर्स प्रा. लि., वडकी तसेच प्राचार्य राजेंद्र वाळुंज यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कौशल्यविकासासाठी विविध यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या मनोगतात संस्थेमध्ये नियमित प्रशिक्षणासोबतच ऑन जॉब ट्रेनिंग, औद्योगिक भेटी, प्रोजेक्टवर्क आणि कार्यशाळा यांसारखे उपक्रम राबविले जात असल्यामुळे कौशल्यविकासाला मोठी मदत झाल्याचे सांगितले. व्यवसाय निदेशकांचे मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष औद्योगिक अनुभवामुळे परीक्षेसोबतच भविष्यातील रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यास मदत झाल्याचे त्यांनी नमूद केले. दिक्षांत सोहळ्याची सुरुवात भारतीय संस्कृतीची परंपरा जपत मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सुविधा पुरवल्याबद्दल उपाध्यक्ष सचिन मथुरावाला यांचा सन्मान

**पुणे : दैनिक संध्या**

कॅम्प येथे नुकताच झालेल्या भगवान वीर गोगादेव जन्मउत्सव पुणे कॅन्टोन्मेंट मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला होता पुणे कॅम्प ट्रायलक हॉटेल न्यू मोदीखाना येथे वीर गोगादेव मंदिर पासून मोठ्या उत्साहात बागड मिरवणूक काढण्यात आली. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाने विविध ठिकाणी 500 विद्युत खांबांच्या रोषणाईसाठी परवानगी दिल्याबद्दल व पुणे कॅन्टोन्मेंट मध्ये संपूर्ण रस्त्यावर पडलेल्या खड्डे बुजवण्यात आले. व स्वच्छता त्याबद्दल पुणे शहर मेहतर वाल्मिकी समाजाच्या वतीने पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे उपाध्यक्ष सचिन मथुरावाला यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला यावेळी वीर गोगादेव जन्मोत्सव सजावट आणि रोषणाईसाठी प्रमुख आणि उत्सव समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अनुपम बेगी, अर्जुन भाई सोलंकी, चंद्रकांत किसन चव्हाण, रफिक भाई पीरजादे, बिल्लू सारवान, चेतन जेधे, आदी उपस्थित होते.

### नियमित आरोग्य तपासणीमुळे गंभीर आजाराचे धोके टाळण्यास मदत

**बारामती: दैनिक संध्या**

मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांची लक्षणे सुरुवातीला दिसत नाहीत. नियमित तपासणीमुळे हे आजार प्राथमिक टप्प्यातच समजतात. त्यामुळे नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणीला प्राधान्य द्यावे, असे आवाहन तक्रारवाडी आरोग्य केंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. मृदुला जगताप यांनी केले. इंदापूर तालुक्यातील मदनवाडी येथे जय हनुमान सार्वजनिक तरुण मंडळ या गणेश मंडळात आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित श्रीगणेशा आरोग्याचा व जिल्हा माहिती कार्यालय पुणे यांच्या वतीने आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी नागरिकांना आरोग्य तपासणी करण्याचे महत्त्व सांगून केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या योजनांची माहिती देण्यात आली. आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, चालणे, संतुलित आहार, पुरेसे पाणी पिणे आणि दैनंदिन जीवनात सक्रिय राहण्याचा सल्ला देऊन नियमित आरोग्य तपासणीमुळे आजारपण वेळेवर ओळखणे, उपचाराचा खर्च कमी होणे आणि निरोगी आयुष्य जगणे शक्य होते. आजार बळावण्यापूर्वीच त्यावर नियंत्रण मिळवता येते, ज्यामुळे भविष्यातील मोठ्या उपचारांचा खर्च टळतो. वेळीच तपासणी केल्यामुळे डॉक्टरांचे तुमच्या प्रकृतीनुसार योग्य आहार, व्यायाम आणि सवयी बदलांबद्दल वैयक्तिक मार्गदर्शन मिळते, असेही डॉ. जगताप यांनी सांगितले.

### सरकारी कामात अडथळा बाबत आरोपी सतत गैरहजर

**जेजुरी : दैनिक संध्या**

जेजुरी पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा रजिस्टर नंबर 89/2011 आणि सेशन केस नंबर 715/2017 व भा द वी कलम 353,325,504,506 असे गुन्हा दाखल असणारा आरोपी महेश बाळासो खोमणे रा . जेजुरी हा न्यायालयीन कामकाजासाठी अनेक दिवसांपासून गैरहजर आहे. सदर आरोपीस दिनांक 1 ऑक्टोबर 2026 रोजी न्यायालयात हजर होण्याची नोटीस शिवाजीनगर न्यायालय पुणे यांनी दिली आहे. अशी माहिती जेजुरी पोलिसांनी दिली आहे. याबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की आरोपी महेश खोमणे याच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी जेजुरी पोलिसांनी 2011 साली गुन्हा दाखल केला होता. याबाबत शिवाजीनगर न्यायालय पुणे येथे न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. मात्र सदर आरोपी सतत गैरहजर असल्याने सेशन कोर्ट पुणे यांनी सदर आरोपीस न्यायालयात दिनांक 1 ऑक्टोंबर रोजी न्यायालयात हजर होण्याची नोटीस बजावली आहे. सदर आरोपी हजर न झाल्यास या प्रकरणाचा एकतर्फा सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल असा इशारा न्यायालयाने दिला असल्याचे जेजुरी पोलिसांनी सांगितलं आहे.



### वाचन संस्कृती रुजवण्यास विद्यार्थ्यांना ऊर्जेचे बळ

**काळदरी : दैनिक संध्या**

आजचे युग मोबाईल, इंटरनेट ,आणि डिजिटल माध्यमाचे असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व वाचन चळवळ वाढावी या उदात्त हेतूने ऊर्जा फूड्स कंपनीच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त माध्यमिक विद्यालय यादव वाडी या विद्यालयात ग्रंथालयीन पुस्तके भेट देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे ऊर्जा फुड्स प्रा . लि . कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री रामदास कुतवळ व सौ . सुवर्णा कुतवळ हे उपस्थित होते.यावेळी कुतवळ यांनी मनोगत व्यक्त करताना ग्रामीण भागातील मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी 25 विद्यालयांना ग्रंथालयासाठी पुस्तके भेट देणार आहोत असे प्रतिपादन केले. तसेच कंपनीच्या डायरेक्टर सौ . सुवर्णा कुतवळ यांनी आपल्या मनोगतात पुस्तक हेच ज्ञान ,विचार, संस्कार आणि मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासाचा पाया भक्कम करणारे साधन आहे असे सांगितले .याप्रसंगी हरगुडे ग्राम विकास संस्थेचे सचिव श्री मोहनराव ताकवले यांनी विद्यार्थ्यांना शालेय जीवनात वाचनाची आवड निर्माण व्हावी व वाचन संस्कृती जपली जावी हा कंपनीचा उदात्त हेतू प्रेरणादायी आहे असे मनोगतातून स्पष्ट केले .संस्थेचे कार्यकारणी सदस्य श्री हनुमंतराव ताकवले यांच्या पुढाकारातून विद्यालयाला ही पुस्तके भेट मिळाली आहेत त्यांनीही आपल्या मनोगत वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हरगुडे ग्राम विकास संस्थेचे सहसचिव श्री उल्हासराव ताकवले हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना कंपनीने प्रेरणादायी पुस्तके दिली त्याचे कौतुक केले वाचनातून आपणास चांगली प्रेरणा मिळते असे विचार स्पष्ट केले विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप नेवसे यांनी प्रास्ताविकातून पाहुण्यांचा परिचय करून दिला याप्रसंगी ऋतुजा पाटील ,राजेंद्र शिरसाट ,दीपक भोसले ,प्रतीक ताकवले, नियोजन ताकवले, अबोली भोंगळे ,अशोक बाणे अब्दुल गनी तांबोळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत निगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक वसंत ताकवले यांनी केले .

# सभेत गोंधळ घालून पुन्हा बोगस सभा : खोटे प्रोसिडिंग लिहिण्याचा प्रयत्न होणार का?

■ **लोणी काळभोर (दै. संध्या)**

थेऊर येथील श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखाना लि. ची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७.०९.२०२६ रोजी होत असुन यावेळी सभेत गोंधळ घालून पुन्हा बोगस सभा व खोटे प्रोसिडिंग लिहिण्याचा प्रयत्न होणार का? असे कृती समितीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रश्न उपस्थित केला .यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नाला कृती समितीच्या सभासदांनी उत्तरे दिली .

यावेळी कृती समितीचे सदस्य पांडुरंग काळे, विकास लवांडे, सुरेश फकिहरा कामठे, राजेंद्र रतन चौधरी, लोकेश कानकाटे, राजेश कोतवाल, अर्जुन यशवंत चौधरी, विठ्ठल बापू हागवणे, रमेश कारभारी कोतवाल, विजय कोतवाल, बाळकृष्ण कामठे, दिपक गावडे व सभासद उपस्थित होते .

यावेळी कृती समितीच्या सदस्यांनी सांगितले की दिनांक २६.०२.२०२५ वा दिनांक २८.०९.२०२५ च्या सर्वसाधारण सभा म्हणजे निव्वळ फार्स होता. एका पण विषयावर सविस्तर चर्चाच केल्या गेल्या नव्हत्या. दोन्ही सभा बिगर सभासदांच्या मदतीने उधळून लावल्या होत्या. तसे पुरावे देखील उपलब्ध आहेत. आणि बनावट व खोटे प्रोसिडिंग लिहीले गेले .त्याबाबत शासनाकडे सविस्तर तक्रारी दाखल आहेत. साखर आयुक्तालय बघ्याची भूमिका घेऊन मुक संमती देत आहे. यामुळे सभासदांची दिशाभूल व फसवणूक झाली आहे. सहकार कायदे पायदळी तुडवले गेले आहेत. हा मनमानी व बेकायदा कारभाराचा उत्तम नमूना आहे. कारखान्याच्या जमीन विक्री बाबत आम्ही थकीत देणी देण्यासाठी गरजे इतकी २०/२५ एकर जमीन विक्री करण्याबाबत सभेत व लेखी निवेदनाद्वारे सुचविले होते. मात्र संचालक मंडळाने मनमानी कारभार केला आहे. सभासदांचे व संस्थेचे कधीही भरून न येणारे आर्थिक नुकसान केलेले आहे. जमीन चालू बाजारभावाप्रमाणे न विकता कमी दराने आपसात व्यक्तिगत पातळीवर ठराव करून विक्री केल्यामुळे संस्थेचे मोठे आर्थिक नुकसान केले आहे . आता पुढील काळात उर्वरित जमीन विक्री करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे कारखान्याची यापुढे एकही एकर जमीन विक्री करू नये.

मनमानी पद्धतीने जमीन विक्री करून आलेल्या पैशाचा विनियोग सभासदांना विश्वासात न घेता करण्याचा प्रयत्न चालू आहे. उदा. सभासद व कामगार यांची थकीत देणी देण्याबाबत एका बाजूला आमचे कडे रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे लेखी कळवतात.



तसे न्यायालयात देखील सादर केले आहे मग आता रेकॉर्ड नसताना थकीत देणी मनमानी पद्धतीने करण्याचा इरादा दिसून येत आहे. वास्तविक ऊस उत्पादक सभासदांची सर्व थकीत देणी रक्कम व्याजासह रुपये ५८.६२ कोटी आहे. त्याबाबत नुकतेच साखर आयुक्तालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर रक्कम स्वतंत्र बँक खात्या मध्ये केवळ शेतकरी सभासदांची थकीत रक्कम देणे कामी राखीव ठेवावी. अन्यत्र खर्च करू नये.अशी मागणी कृती समितीने केली आहे . कारखान्याचे रेकॉर्ड उपलब्ध करणे शक्य असताना केवळ एक बहाणा करून अडीच वर्षात त्याबाबत काहीही प्रयत्न झाले नाहीत. परिणामी संस्थेचे व सभासदांचे मोठे नुकसान झाले आहे. उदा. थकीत ऊस बिले व्याजासह, ठेवी, वारस नोंद अनामत रकमा, सोसायटी व बँकांच्या कपाती, अनपेड बिले इत्यादी मनमानी मोघम आकडेवारी दिली आहे. त्याबद्दल कसलेही कामकाज झालेले नाही.दिनांक २६.०२.२०२५ चे सभेतील इतिवृत मधील ठराव क्रमांक ८ मध्ये ड्यू डिलीजन्सचा ठराव कोणतीही सविस्तर चर्चा न होता नेमणूक केलेले तांत्रिक, कायदेशीर, आर्थिक तपासणीचे काम केलेले सल्लागार यांनी साखर प्लांट रु. २२.०० कोटी व डिस्टिलरी प्लांट रु. ६.०० कोटी चा दिलेला अहवाल मंजूर केलेला आहे. सभासदांनी लेखी मागणी करून प्रत्यक्ष निरीक्षण करावयास न देता चर्चे विना मंजूर केलेल्या आहे.

यामध्ये कार्यकारी संचालक यांनी कलम ३२ नुसार सभासदांना माहीती न देण्यामध्ये कर्तव्य कसूरी केलेली आहे. कायदेशीर सल्लागार यांनी मिसिंग वस्तु बाबत काय अभिप्राय दिले आहेत याची माहिती नाही. याबाबत चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी संचालकांना देखील त्यांचे मागणी नुसार मशीनरी, मिसिंग व इतर अत्यावश्यक माहिती व कागदपत्रे दिलेली नाही. त्यामुळे त्याची उपसमिती नेमून स्वतंत्र चौकशी होऊन अहवाल घेऊन विशेष सभेपूढे सभासदांचे मंजूरीसाठी मांडणे आवश्यक आहे.

येत्या दिनांक २७.०९.२०२६ रोजी नियोजित वार्षिक सर्वसाधारण सभे बाबत अहवाल सभासदांना प्रत्यक्ष प्राप्त झालेले नाहीत. विषय पत्रिकेत मनमानी १६ विषय घेतले असून यातुन सभेत गोंधळ घालून सभा उधळून पुन्हा बोगस सभा व खोटे प्रोसिडिंग लिहिण्याचा प्रयत्न दिसत आहे . नात्यागोत्याचे व भावकीचे राजकारण बंद करून सभासदांच्या हितासाठी व कारखाना सुरू होण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. असे कृती समितीच्या सदस्यांनी सांगितले.


## महामार्ग वेगाने वाढले, माणूस सुरक्षित झाला का?

**एक काळ असा होता, जेव्हा रस्ते धुळीने भरलेले, खड्ड्यांनी भरलेले आणि प्रवास नेहमीच संथ असायचा. प्रवास म्हणजे थकवा आणि वेळेचा अपव्यय होत असे. पण आज, एकविसाव्या शतकात, भारत आणि महाराष्ट्र यांचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. आता 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग', 'मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे' आणि नव्या द्रुतगती मार्ग उभे राहिले आहेत. हे रस्ते आधुनिक अभियांत्रिकीचे उदाहरण आहेत. या रस्त्यांवरून वाहने झपाट्याने धावतात आणि लांबचे अंतर काही तासांत कापता येते. या वेगवान रस्त्यांमुळे शेतीमाल, कारखान्यातील वस्तू आणि गरजेच्या सेवा कमी वेळात बाजारात पोहोचतात. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते. पण या वेगाच्या चमचमात एक महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्न अजूनही उरतो. "महामार्ग वेगवान झाले, पण माणूस सुरक्षित झाला का?"**

रस्ते चांगले असणे हे प्रगतीचे लक्षण आहे, पण असा गैरसमज आहे की चांगला रस्ता आपोआप सुरक्षितता वाढवतो. आधुनिक महामार्गांवर नियंत्रित प्रवेश, दुभाजक, स्पष्ट पट्टे, क्रॅश बॅरियर्स आणि रात्री प्रकाशाची व्यवस्था असते. हे सर्व उपाय अपघातांची शक्यता काही प्रमाणात कमी करतात. पण ते चालकाची चूक पूर्णपणे टाळू शकत नाहीत. उलट, गुळगुळीत आणि मोकळे रस्ते अनेक चालकांना अतिवेगाने गाडी चालवण्याचा खोटा आत्मविश्वास देतात.

"रस्ता जितका वेगवान, तितकी चूक महाग" हे लक्षात ठेवायला हवे. कमी वेगात झालेली चूक आणि शंभरपेक्षा जास्त किलोमीटर प्रति तास वेगात झालेली चूक यांचे परिणाम कधीच सारखे नसतात. इथे 'वेग आणि तीव्रता' याचे गणित समजून घ्यायला हवे. आता प्रश्न फक्त "अपघात किती होतात?" एवढाच राहिलेला नाही. "अपघात झाला तर त्याची तीव्रता किती भीषण असते?" हाही मोठा प्रश्न आहे. एका सेकंदाची डुलकी, मोबाईलकडे गेलेले लक्ष, चुकीच्या लेनमध्ये गेलेली गाडी किंवा अचानक लागलेला ब्रेक, कमी वेगात या चुकांवर नियंत्रण मिळवता येते. पण वेगाने धावणाऱ्या महामार्गावर एका सेकंदाची चूक थेट आयुष्याचा शेवट ठरू शकते.

आज आपल्या गाड्यांमध्ये अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम, एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्टेबिलिटी कंट्रोल आणि आधुनिक सेन्सर्ससारखी सुरक्षा तंत्रे आली आहेत. आपण गाडीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणले आहे. पण वाहन चालवण्याच्या संस्कृतीत ती शहाणपण आली का? सिटबेल्ट न लावणे, वेगाच्या



मर्यादा न पाळणे, धावत्या गाडीत मोबाईलवर बोलणे आणि लेनची शिस्त न पाळणे या मानवी चुका आजही आहेत. रस्ते मोकळे आहेत. वाहने आधुनिक आहेत. पण चालकाचे मन आणि शिस्त अजूनही मागेच आहेत.

आधुनिक महामार्गांवरील प्रवेश आणि निर्गमनाची व्यवस्था अतिशय शिस्तबद्ध असते. पण अनेकदा चालकाचा 'एक्झिट' चुकतो. तिथूनच चुकीचे निर्णय सुरू होतात, जसे की रिव्हर्स गियारमध्ये गाडी मागे घेणे, अचानक ब्रेक दाबणे किंवा थेट विरुद्ध दिशेने गाडी पळवणे. दहा मिनिटे किंवा काही किलोमीटर वाचवण्यासाठी माणूस स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात का घालतो? हा केवळ वाहतुकीचा नियम मोडण्याचा नाही. हा मानसिक प्रगल्भतेचा प्रश्न आहे.

आज महामार्गांवर सीसीटीव्ही, स्पीड कॅमेरे, एएनपीआर आणि इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम लावले आहेत. ई-चलनाद्वारे दंडही आकारला जातो. पण इथे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. कॅमेरा अपघातानंतर पुरावा देऊ शकतो. पण अपघात होण्यापूर्वी चालकाच्या मनातील चुकीचा निर्णय थांबवू शकतो का? दंड मोठा असला तरी "आपण पकडले जाणार नाही" असा अतिआत्मविश्वास जिथे असतो, तिथे केवळ कॅमेरे सुरक्षा देऊ शकत नाहीत. त्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीसोबत वर्तणुकीत बदल होणे गरजेचे आहे.

एका अपघाताचा खर्च फक्त गाडी दुरुस्त करणे किंवा रुग्णालयाचे बिल भरणे एवढाच राहत नाही. यात मानवी जीवितहानी, कुटुंबाचे उद्ध्वस्त झालेले भविष्य, पुनर्वसन आणि समाजाचे अपूरणीय नुकसान यांचा समावेश असतो. आपण ज्या महामार्गावर दोन तास प्रवासात वाचवतो, पण एखाद्याचा जीव गमावतो, त्या वेगाचे अर्थकारण मोजता येईल का? महामार्गाची गुणवत्ता तिथे गाड्या किती वेगाने धावतात यावर ठरवू नये. ती गुणवत्ता त्या वेगाने किती लोक सुरक्षितपणे घरी पोहोचतात, यावर ठरवायला हवी. थोडक्यात सांगायचे तर, महामार्गांनी माणसाला गती दिली आहे. पण खरी सुरक्षितता केवळ काँक्रीटच्या रस्त्यांवरून मिळत नाही. ती चालकाच्या मानसिकतेवर आणि संयमावर अवलंबून असते. रस्ते कितीही चांगले झाले, तरी आपण वेगाची भाषा समजताना जबाबदारी ठेवत नाही, तोपर्यंत प्रवास सुखकर होणार नाही.

खरं तर रस्ता आपल्याला खूप काही सांगत असतो. "मी तुला वेग देईन, दिशा देईन, मार्गही दाखवीन. पण ब्रेक कधी दाबायचा, हा निर्णय अजूनही तुझाच आहे." मला वाटतं वेगाचा विवेक आपण बाळगायलाच हवा.

- राहूल हरीभाऊ इंगळे पाटील - मोबाईल ९८९०५७७१२८
शिक्षण : एम.ए.बी.एड.अर्थशास्त्र

## आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त शासकीय रुग्णालयात जनजागृतीपर उपक्रम



■ **बारामती(दै. संध्या)**

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती येथील मानसोपचार विभागाच्या वतीने विविध जनजागृतीपर उपक्रमांचे अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले. "आत्महत्येबद्दल बोलणे ही कमजोरी नसून मदतीकडे जाणारे पहिले पाऊल आहे. योग्य वेळी सुरू झालेला एक संवाद एखाद्याचे जीवन वाचवू शकतो," असा संदेश डॉ. पाटील यांनी दिला.

या उपक्रमांत आत्महत्येच्या प्रतिबंधासाठी संवाद, संवेदनशील ऐकणे आणि वेळेत मदत घेण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. "आत्महत्येबद्दलची कथा बदलूया!" या संदेशासोबत "मौन तोडा, संवाद सुरू करा, ऐका, साथ द्या, मदतीशी जोडा" हा संदेशही देण्यात आला. वैद्यकीय तसेच नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पोस्टर, स्लोगन, निबंध व काव्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागाच्या परिसरात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी आत्महत्येची संभाव्य चेतावणीची लक्षणे, जोखमीची चिन्हे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली. मानसोपचार विभागातील तज्ज्ञांनी आत्महत्येचे विचार व्यक्त करणाऱ्या व्यक्तीचे शांतपणे व संवेदनशीलतेने ऐकून घेणे, गंभीर संकेतांकडे गांभीर्याने पाहणे, वेळेत मदत घेणे आणि आवश्यकतेनुसार मानसिक आरोग्य तज्ज्ञांशी संपर्क साधणे याबाबत मार्गदर्शन केले. अधिष्ठाता अंजली पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महाविद्यालय व रुग्णालयात छात्र मानस कक्ष कार्यरत असल्याची माहिती दिली. तसेच शैक्षणिक किंवा वैयक्तिक ताणतणावाचा सामना करताना समस्या मनात न ठेवता योग्य वेळी मार्गदर्शन व मानसिक आरोग्यविषयक मदत घेण्याचे आवाहन केले. यावेळी मानसोपचार प्रश्नमंजुषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल डॉ. आदिती सातव व डॉ. रती तारापूर यांचा डॉ. अंजली पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. विवेक सहस्रबुद्धे यांच्यासह मानसोपचार विभागातील डॉक्टर, वैद्यकीय व नर्सिंग विद्यार्थी तसेच रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# रक्ताचा तुटवडा टाळण्यासाठी रक्तदान शिबिरांची गरज : नितीन गोरे

■ **चाकण (दै. संध्या)**

अपघातग्रस्तांचे प्राण वाचविण्यासाठी रक्ताची नितांत गरज असताना ऐनवेळी मात्र होत असलेला रक्ताचा तुटवडा टाळण्यासाठी रक्तदान शिबिरांची नितांत गरज आहे. रक्तदान शिबिरे घेण्यासाठी सेवाभावी संस्था, संघटना व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला पाहिजे, अशी अपेक्षा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा गटनेते नितीन गोरे यांनी व्यक्त केली.

चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना नितीन गोरे बोलत होते. याप्रसंगी चाकण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच प्रितमभाई परदेशी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, डॉ. सायली जाधव, माजी नगरसेवक राहुल कांडगे, उद्योजक योगेश राजापूरकर, अमर इंगळे, स्वप्निल बिरदवडे, नगरसेवक मंगेश कांडगे, नगरसेविका सुवर्णा राक्षे, आरती परदेशी, पूनम शेवकरी, शशिकांत जाधव, स्मिता जाधव, अॅड. वर्षा शेवकरी, रिया शर्मा, वीरेंद्र सिंग, रूपाली कांबळे, नितीन मगदूम आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तत्त्व लॅबच्या व्यवस्थापिका डॉ. सायली जाधव यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिरात तीनशे बाटल्यांचे संकलन झाले. रक्तदात्यांना यावेळी नितीन गोरे, प्रितम परदेशी व राहुल कांडगे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र आणि हेल्मेट देऊन गौरविण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व गटनेते साहेबराव कड यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

या रक्तदान शिबिराला तरुण व तरुणींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याचे रूपाली कांबळे व रिया शर्मा यांनी सांगितले. प्रितम परदेशी यावेळी म्हणाले,"आजच्या काळात विविध आजार आणि अपघातांमुळे रक्ताची मोठी टंचाई



भासते. ही गरज लक्षात घेऊन आणि रुग्णांना वेळेवर मदत मिळावी यासाठी रक्तदान शिबिरांची गरज आहे. रक्तदाना सारख्या पवित्र दानासोबतच रस्ते सुरक्षेचा संदेश देण्यासाठी सर्व रक्तदात्यांना हेलमेटची अनोखी भेट देण्यात आली. योगेश राजापूरकर यांनी सूत्रसंचालन, तर अमर इंगळे यांनी प्रास्ताविक केले. आरती परदेशी यांनी स्वागत केले.